महाराष्ट्र शासन
**अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय,**
तळ मजला, पोलीस महासंचालककार्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.
**दुरध्वनी क्र. ०२२-२२०२१००५/ २२८१०२२२ ई-मेल आयडी**adgp.trg@mahapolice.gov.in

क्र. प्रशि/अपोमसं/प्रशि-२/पोउपअधी/अपोअधी/ नवीन फौ. कायदे/८६२.        दि.२६/०६/२०२४.

**विषय :** नवीन फौजदारी कायदे संबंधातील माहिती पुस्तिका तपासी अंमलदारांना देणेबाबत.

केंद्र सरकारने तीन नवीन फौजदारी कायदे संमत केले असून त्याची अंमलबजावणी दि.१ जुलै २०२४ पासुन करण्यात येणार आहे. सदर कायदयांमध्ये पोलीस तपासाची कार्यप्रणाली व प्रक्रिया यामध्ये काही बदल झाले आहेत. याबाबत सुलभ संदर्भासाठी श्री. मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी पुढाकार घेऊन तपासी अधिकारी यांचेकरीता उपयुक्त माहिती पुस्तिका तयार केलेली आहे. सदर माहिती पुस्तिका या सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे.

सर्व घटक प्रमुखांना याव्दारे विनंती करण्यात येते की या माहिती पुस्तिकेची Soft Copy आपल्या अधिनस्त सर्व कनिष्ठ पोलीस अधिकारी/ कर्मचारी तपासी अंमलदार यांना दयावी व त्यातील नमुद SOP चे अनुपालन करावे.

**(मा. पोलीस महासंचालक यांच्या मान्यतेने)**

RAJKUMAR MARUTI VHATKAR

Digitally signed by RAJKUMAR MARUTI VHATKAR
Date: 2024.06.26 15:59:48 +05'30'

**( राजकुमार व्हटकर)**
अपर पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उप महानिरीक्षक,
सर्व पोलीस अधीक्षक.

# महाराष्ट्र राज्य पोलीस

# प्रमुख तीन नवीन सुधारीत कायदे गुन्ह्यांचे तपासाबाबत माहिती पुस्तिका

## (प्रथम आवृत्ती - जुन २०२४)

(फक्त खात्याअंतर्गत वापरासाठी)

# मनोगत

भारतातील प्रमुख तीन फौजदारी कायदयांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. भारतीय दंड संहिता १८६० ऐवजी भारतीय न्याय संहिता २०२३, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ ऐवजी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ व भारतीय पुरावा कायदा १८७२ ऐवजी भारतीय साक्ष अधिनियम २०२३ याप्रमाणे कायदयांच्या नावात बदल करण्यात आलाआहे. या तीनही कायदयांना भारत सरकारने अधिसुचना जारी करुन मंजुरी दिली असल्याने दिनांक ०१ जुलै २०२४ पासुन तीनही कायदे संपुर्ण भारतात अंमलात येणार आहेत.

या अनुषंगाने महाराष्ट्र पोलीस दलातील सर्व तपास अधिकारी व अंमलदार यांच्या गुन्हे अन्वेषण कामकाजामध्ये अचुकता व गतिमानता येण्यासाठी व गुन्हे दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याकरीता 'गुन्हे माहिती पुस्तिका' तयार करण्यात आली आहे. पोलीस स्टेशनमध्ये दाखल होणारे शरीराविरूध्दचे गुन्हे, महिला व बालकांविरूध्द घडणारे गुन्हे, मालमत्तेसंबंधी गुन्हे, आर्थिक गुन्हे, संघटित व किरकोळ संघटित गुन्हेगारी, दहशतवादी कृत्य तसेच अपघातासंबंधी गुन्हे यामधील कार्यपध्दती संबंधी मानक कार्यप्रणाली (**SOP**) दिलेली आहे.

गुन्हयाची प्रथम खबर दाखल झाल्यापासुन ते गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर होईपर्यंत तपासात आवश्यक असणाऱ्या बाबी व त्यासंबंधी आवश्यक प्रश्नावली यांची पडताळणी सुची तयार करण्यात आली आहे. तसेच नवीन कायदा व जुना कायदा यामधील कलमांचा तुलनात्मक तक्ता देण्यात आला आहे. जेणेकरून झालेला बदल व सुधारणा यामुळे गुन्हा दाखल करताना कलमांबाबत व तपासाबाबत संभ्रम निर्माण होणार नाही.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातर्फे नवीन तीनही कायदयातील बदल व सुधारणा लक्षात घेऊन गुन्ह्यांचे तपासाबाबत वेगवेगळ्या प्रकरणी अनुसरावयाच्या मानक कार्यप्रणालीची उत्कृष्ट माहीतीपुस्तीका तयार करण्यात आली आहे. सदर माहिती पुस्तिकेचा सर्व तपास अधिकारी व अंमलदार यांच्या तपासात सुसुत्रता आणणेकामी निश्चितच मार्गदर्शन व मदत होईल असा विश्वास व्यक्त करून मी सर्वांना शुभेच्छा देते !

**श्रीमती रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य

# अनुक्रमणिका


| अ.क्र | शीर्षक | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १ | भारतीय न्याय संहिता मधील प्रमुख नवीन बदल. | १ - ३ |
| २ | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील प्रकरण ०५-व्यक्तींना अटक करणे. | ४ - ८ |
| ३ | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील प्रकरण १३ - प्रथम खबर आणि अन्वेषण करण्याचे पोलिसांचे अधिकार. | ९ - १२ |
| ४ | भारतीय साक्ष अधिनियम (B.S.A) प्रमुख नवीन बदल. | १३ |
| ५ | महिला व बालकांविरुद्ध गुन्ह्यांच्या तपासाबाबत मार्गदर्शक प्रश्नावली. (चेकलिस्ट क्रमांक - ०१) | १४ - २२ |
| ६ | हुंडाबळी, विवाहितेस क्रुर वागणुक देणे तसेच नवजात अर्भक/बालकांबाबत गुन्ह्याचे तपासाबाबत मार्गदर्शक प्रश्नावली. (चेकलिस्ट क्रमांक - ०२) | २३ - ३० |
| ७ | शरीराविरुद्ध गुन्ह्यांच्या तपासाबाबत मार्गदर्शक प्रश्नावली. (चेकलिस्ट क्रमांक - ०३) | ३१ - ३८ |
| ८ | लोकसेवकांवरील हल्यांबाबत गुन्हयांचे तपासाबाबत मार्गदर्शक प्रश्नावली. (चेकलिस्ट क्रमांक - ०४) | ३९ - ४४ |
| ९ | गैरकायद्याची मंडळी/गर्दी मारामारीच्या गुन्ह्यांच्या तपासाबाबत मार्गदर्शक प्रश्नावली (चेकलिस्ट क्रमांक - ०५) | ४५ - ५२ |
| १० | मालमत्तेसंदर्भातील गुन्ह्यांच्या तपासाबाबत मार्गदर्शक प्रश्नावली. (चेकलिस्ट क्रमांक - ०६) | ५३ - ५९ |
| ११ | अपघाताचे गुन्ह्यांच्या तपासाबाबत मार्गदर्शक प्रश्नावली. (चेकलिस्ट क्रमांक - ०७) | ६० - ६६ |
| १२ | आर्थिक गुन्ह्यांच्या तपासाबाबत मार्गदर्शक प्रश्नावली. (चेकलिस्ट क्रमांक - ०८) | ६७ - ७८ |
| १३ | दहशतवादी कृत्य, संघटीत गुन्हेगारी, किरकोळ संघटीत गुन्हेगारी इ. बाबत नवीन कलमांचा तक्ता. | ७९ - ८० |
| १४ | अनुसुचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमाप्रमाणे गुन्हे दाखल करताना सोबत भारतीय न्याय संहितेचे कलमांचा तक्ता. | ८१ - ८२ |
| १५ | अदखलपात्र गुन्ह्यांसंबंधीत कलमांचा तुलनात्मक तक्ता. | ८३ |
| १६ | भारतीय न्याय संहिता २०२३ कायद्यामधील ७ वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या कलमांचे वर्गीकरण | ८४-८७ |
| १७ | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील महत्वाच्या टाईमलाईन | ८८-९२ |


(Disclaimer - या माहीती पुस्तीकेतील कायद्यासंबंधात कोणताही संभ्रम असल्यास संबंधीत कायद्याच्या मुळ पुस्तकाचे अवलोकन करावे )

# भारतीय न्याय संहिता – २०२३

## प्रमुख बदल

### व्याख्या

**B.N.S.कलम २(३) -**
बालक याचा अर्थ १८ वर्षाखालील कोणतीही व्यक्ती असा आहे.

**B.N.S. कलम २(१०) नुसार Gender (लिंग) -**
तो हे सर्वनाम जिथे जिथे वापरले असेल त्यात पुरुष व स्त्री सोबत तृतीयपंथी (Transgender) यांचा समावेश केला आहे. पोलीस ठाण्यामध्ये तृतीयपंथी तक्रार देण्यास आल्यास तो सांगेल (स्वत:ला स्त्री किंवा पुरुष समजतो) त्या प्रमाणे तक्रार घेण्यात यावी.

**सामायिक इरादा B.N.S.कलम ३(५) -**
एकापेक्षा जास्त आरोपींचा गुन्ह्यामध्ये सहभाग असेल तर सदर कलम लावण्यात यावे. गुन्ह्यात आरोपीचा सहभाग असो अथवा नसो परंतु गुन्ह्यासंबंधी सामायिक इरादा असल्याचे निष्पन्न झाल्यास सदर आरोपीने तो गुन्हा केला आहे असे समजावे.

**B.N.S.कलम ४८ -**
भारतामध्ये अपराध असलेल्या गुन्ह्याच्या अपराधाचे भारताबाहेरील अपप्रेरण, जी कोणतीही कृती भारतात केली गेली तर अपराध ठरेल ती कृती करण्यास जी व्यक्ती भारताबाहेर आणि त्याच्या पलीकडे असताना भारतात करण्यास अपप्रेरणा देते ती व्यक्ती या संहितेनुसार अपराध करते.

**फौजदारीपात्र कट बाबत शिक्षा B.N.S.कलम ६१(१) -**
एकापेक्षा जास्त आरोपी गुन्ह्यामध्ये सहभागी असल्यास सदर कलम लावण्यात यावे. गुन्ह्यात आरोपीचा सहभाग असो अथवा नसो परंतु गुन्ह्यासंबंधी फौजदारीपात्र कट केल्याचे निष्पन्न झाल्यास सदर आरोपीताने तो गुन्हा केला आहे असे समजावे.

**B.N.S.कलम ६९** - फसवे मार्ग इ. वापर करुन त्याद्वारे लैंगिक समागम -
जो कोणी, फसव्या मार्गाद्वारे किंवा एखाद्या स्त्रीशी विवाह करण्याचे वचन देवुन, ते पुर्ण करण्याचा कोणताही हेतु नसताना, तिचेशी लैंगिक समागम करेल, असा लैंगिक समागम बलात्कार या सदरात मोडत नसेल तर त्याला १० वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा व द्रव्यदंड होईल.
स्पष्टीकरण - फसवे मार्ग यामध्ये रोजगाराची किंवा पदोन्नतीचे प्रलोभन किंवा ओळख लपवुन विवाह करण्याचे खोटे वचन यांचा समावेश असेल.

**B.N.S.कलम ९५** - अपराध करण्यासाठी एखाद्या बालकाला भाड्याने घेणे, कामावर ठेवणे, गुंतवणे - जो कोणी, कोणत्याही बालकाला अपराध करण्यासाठी भाड्याने घेतो, कामावर ठेवतो किंवा गुंतवुन ठेवतो त्याला, तीन वर्षापर्यंत कमी नसेल ते १० वर्षापर्यंत असु शकेल इतक्या मुदतीची कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**<u>B.N.S.कलम १०३(२)</u>** - <u>सार्वजनिक हत्या **(Mob Lynching)**</u> -

पाच किंवा अधिक व्यक्तिंच्या जमावाने एकत्र येऊन धर्म, वंश, जात, जनसमाज, भाषा, लिंग, वैयक्तिक विश्वास किंवा इतर तत्सम कारणांवरुन खुन घडवुन आणल्यास मृत्यु किंवा आजन्म कारावासाची शिक्षा आणि द्रव्यदंड देण्यात येईल.

**<u>B.N.S.कलम ११७(४) -जबर/ गंभीर दुखापत (Mob Lynching)</u>**

पाच किंवा अधिक व्यक्तिंच्या जमावाने एकत्र येऊन धर्म, वंश, जात, जनसमाज, भाषा, लिंग, वैयक्तिक विश्वास किंवा इतर तत्सम कारणांवरुन जबर/गंभीर दुखापत केली असेल तर ०७ वर्षे कारावासाची शिक्षा आणि द्रव्यदंड देण्यात येईल.

**<u>B.N.S.कलम १०४ - आजन्म कारावासात असलेल्या आरोपीने खुन केल्यास शिक्षा</u>**

आरोपीने आजन्म कारावासात असताना खुन केल्यास त्यास मृत्यु किंवा आजन्म कारावासाची अशी जे त्या व्यक्तीच्या नैसर्गिक आयुमर्यादेच्या काळात त्याला तुरुंगातच आयुष्य घालवावे लागेल अशी सश्रम कारावासाची शिक्षा होईल.

**<u>B.N.S.कलम १०६</u>** - <u>निष्काळजीपणामुळे मृत्युस कारण होणे</u> -

१) जो कोणी, सदोष मनुष्य वध या सदरात न मोडणारे बेदरकार किंवा निष्काळजीपणाची कृती करुन कोणत्याही व्यक्तीच्या मृत्युस कारण होईल त्याला, ०५ वर्षापर्यंत कारावास व द्रव्यदंडास पात्र होईल आणि जर अशी कृती एखाद्या वैद्यक व्यवसायिकाने वैद्यकीय प्रक्रिया पार पाडत असताना केली असेल तर ०२ वर्षे कारावास व द्रव्यदंडास पात्र होईल.

२) जो कोणी, बेदरकारपणे व निष्काळजीपणामुळे वाहन चालविल्यामुळे सदोष मनुष्यवध या सदरात न मोडणारी कोणतीही कृती करुन कोणत्याही व्यक्तीच्या मृत्युस कारणीभुत होईल आणि पोलीसांना किंवा दंडाधिकारी यांना अशी घटना घडल्यानंतर लगेचे घटनेची माहीती न देता पळुन जाईल त्यास १० वर्षे शिक्षा व द्रव्यदंडास पात्र होईल.

**<u>B.N.S.कलम ११४</u>** - <u>साधी दुखापत (हाताचापट्याने मारहाण करणे.)</u>

**<u>B.N.S.कलम ११६</u>** - <u>गंभीर दुखापत (दुखापातीची ०८ कारणे.)</u>

१) पुंस्त्वहरण (पुरुषत्वभंग).
२) कोणत्याही डोळ्याचा दृश्यशक्तीचा कायमचा विच्छेद करणे.
३) कोणत्याही कानाचा श्रवणशक्तीचा कायमचा विच्छेद करणे.
४) कोणताही अवयव किंवा सांधा यापासुन विच्छेद करणे.
५) कोणताही अयवय किंवा सांधा त्यांच्या शक्तीचा नाश किंवा त्यात कायमचा बिघाड करणे.
६) मस्तक किंवा चेहरा कायमचा विद्रुप करणे.
७) हाड किंवा दात मोडणे किंवा निखळवणे.
८) ज्या दुखापतीमुळे जिवीत धोक्यात येते अथवा पिडीत व्यक्तीला **<u>१५ दिवस इतका काळ दु:खासह शारिरीक वेदना सहन करावी लागते</u>** किंवा तिचे नेहमीचे व्यवसाय चालु ठेवणे अशक्य होते अशी कोणतीही दुखापत.

**B.N.S.कलम १५२ -**

भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता धोक्यात आणणारी कृती करणे.

**B.N.S.कलम २२६ -**

कायदेशीर अधिकार बजाविण्यास किंवा वापरण्यास प्रतिबंध करण्यास सक्ती करण्यासाठी म्हणुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे.

**B.N.S.कलम ३०३(२) -**

चोरीची मालमत्ता ५ हजार रु. पेक्षा कमी असेल किंवा ती व्यक्ती प्रथम दोषी असेल तर त्यास समाजसेवेची शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे.

**B.N.S.कलम ३०४(२) -** हिसकावुन घेणे (नवीन कलम )

चोरी करण्याच्या उद्देशाने गुन्हेगाराने कोणत्याही व्यक्तीकडुन किंवा त्या व्यक्तीच्या ताब्यात असेलेली जंगम मालमत्ता त्वरेने किंवा अचानक किंवा बळजबरीने हस्तगत करेल किंवा तिच्या ताब्यातुन घेऊन जाईल तरी ते हिसकावुन घेणे ही चोरी आहे.

# भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३

## प्रकरण ०५ - व्यक्तींना अटक करणे

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता यांचे कायद्यांचा तुलनात्मक तक्ता

| अ.क्र | तपासाची प्रक्रिया | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ B.N.S.S. | फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ Cr.P.C. |
|---|---|---|---|
| १ | पोलीस वॉरंटशिवाय केव्हा अटक करु शकतात. | ३५ (१)/(२) | ४१ |
| २ | पोलीस अधिकारी यांचेसमोर उपस्थित होण्याची नोटीस. | ३५(३) ते (६) | ४१-अ |
| ३ | अटकेची कार्यपद्धती व अटक करणाऱ्या अधिकाऱ्याची कर्तव्य. | ३६ | ४१-ब |
| ४ | जिल्ह्यातील नियंत्रण कक्ष/पदनिर्देशित अधिकारी. | ३७ | ४१-क |
| ५ | चोरीची मालमत्ता/संशयीत मालमत्ता ताब्यात घेऊन कारवाई करणेबाबत. | ३५(१)(ड) | ४१(१)ड |
| ६ | चौकशी करतेवेळी आपल्या पसंतीच्या अधिवक्त्यास भेटण्याबाबतचा अटक केलेल्या व्यक्तीचा अधिकार. | ३८ | ४१-ड |
| ७ | नाव - गाव सांगण्यास नकार दिल्यास अटक. | ३९ | ४२ |
| ८ | खाजगी व्यक्तीकडुन अटक आणि नंतरची प्रक्रिया. | ४० | ४३ |
| ९ | दंडाधिकाऱ्याकडुन अटक. | ४१ | ४४ |
| १० | सशस्त्र सेनादलांच्या सदस्यांना अटकेपासुन संरक्षण. | ४२ | ४५ |
| ११ | अटक करण्याची प्रक्रिया. | ४३ | ४६ |
| १२ | अटकेस पात्र व्यक्तीने प्रवेश केलेल्या बंदिस्त स्थळाची झडती. | ४४ | ४७ |
| १३ | अपराध्याचा अन्य क्षेत्रात पाठलाग. | ४५ | ४८ |
| १४ | अटक करण्यात आलेल्या व्यक्तीवर ती निसटुन जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी कोणताही अनावश्यक निर्बंध नसावा. | ४६ | ४९ |
| १५ | अटकेची माहीती सांगणे, जामीन हक्काची माहीती देणे. | ४७ | ५० |
| १६ | अटक करणाऱ्या व्यक्तीचे, अटकेबाबत नामनिर्देशित व्यक्तीला कळविण्याचे दायित्व. | ४८ | ५०-अ |
| १७ | अटक झालेल्या व्यक्तीची झडती. | ४९ | ५१ |
| १८ | मारक हत्यारे जप्त करण्याचा अधिकार. | ५० | ५२ |
| १९ | पोलीसांच्या विनंतीवरुन वैद्यक व्यवसायीने आरोपीची तपासणी करणे. | ५१ | ५३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | **बलात्काराचा आरोप असलेल्या व्यक्तीची वैद्यक व्यवसायीकडुन तपासणी.** | ५२ | ५३-अ |
| २१ | **अटक केलेल्या व्यक्तीची वैद्यकीय अधिकाऱ्याकडुन तपासणी.** | ५३ | ५४ |
| २२ | **अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची ओळख (ओळख परेड).** | ५४ | ५४-अ |
| २३ | **पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय अटक करण्यासाठी दुय्यम अधिकाऱ्याला प्रतिनियुक्त करतो तेव्हाची प्रक्रिया.** | ५५ | ५५ |
| २४ | **अटक केलेल्या व्यक्तीचे आरोग्य व सुरक्षा.** | ५६ | ५५-अ |
| २५ | **अटक व्यक्तीस विनाविलंब मॅजिस्ट्रेटपुढे हजर करणे.** | ५७ | ५६ |
| २६ | **अटक व्यक्तीला २४ तासांपेक्षा जास्त काळ स्थानबद्ध करुन ठेवावयाचे नाही.** | ५८ | ५७ |
| २७ | **अटकेचे वृत्त अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने संबंधीत अधिकारी यांना कळविणे..** | ५९ | ५८ |
| २८ | **अटक केलेल्या व्यक्तीची मुक्तता करणे.** | ६० | ५९ |
| २९ | **निसटलेल्या इसमाचा पाठलाग करणे व पुन्हा अटक करणे.** | ६१ | ६० |
| ३० | **संहितेनुसार काटेकोरपणे अटक करणे.** | ६२ | ६०-अ |

## आरोपीचे अटकेबाबत

१) ७ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यामध्ये आरोपीस अटक करणे आवश्यक असल्याबाबत तपास अधिकारी/अंमलदार यांनी खात्री करुन सबळ कारणावरुन आरोपीस अटक करावी.

२) अटक केल्यानंतर अटकेबाबत ठाणे दैनंदिनी व केस डायरी मध्ये नोंद घेण्यात यावी.

३) आरोपीस त्याचेविरुद्ध दाखल गुन्ह्याची, जामीनाच्या हक्कांची तसेच अटकेच्या कारणांची माहीती देण्यात यावी, त्यास तपास अधिकारी यांनी समक्ष माहीती द्यावी. **(B.N.S.S.४७)**

४) ७ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यामध्ये तपास अधिकारी यांना आरोपीस अटक करण्याची आवश्यकता वाटत नसल्यास आरोपीस नोटीस देता येईल. **(B.N.S.S. ३५(३))**

५) आरोपीस द्यावयाच्या नोटीसचा नमुना **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता** मधील दुसरी अनुसुची नमुना क्रमांक १ मध्ये देण्यात आला आहे.

६) अटक करण्यात येणाऱ्या व्यक्तीच्या अटकेबाबत त्याचे नातेवाईक किंवा मित्र यांना माहीती देणे तपास अधिकारी यांना बंधनकारक आहे. **(B.N.S.S. ४८)**

७) आरोपी अटक करताना त्याचे अंगझडतीचे वेळी त्याचे ताब्यात घातक हत्यारे मिळुन आल्यास ती जप्त करुन त्याबाबत अहवाल लगेचच मा. न्यायालयास सादर करणे आवश्यक आहे. (**B.N.S.S. कलम ५०)**

८) महिला आरोपीस महिला पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे समक्ष (उपस्थितीत) अटक करणे बंधनकारक आहे.

९) आरोपीस अटक करतेवेळी अटकपुर्व वैद्यकीय तपासणी करण्यात यावी.

१०) विधीसंघर्षग्रस्त बालक यास पोलीस ठाण्यास घेऊन येवु नये, त्यामध्ये जे.जे. ॲक्ट प्रमाणे दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

११) आरोपीस अटक भारतीय नागरी सुरक्षा संहितेच्या सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करुन करण्यात यावी. (**B.N.S.S. कलम ६२)**

१२) आरोपीला अटक करतेवेळी पोलीस अधिकारी यांनी आपली ओळख आरोपीस द्यावी.

१३) अटक आरोपीची स्वाक्षरी तसेच नातेवाईक यांची स्वाक्षरी अटक पंचनामावर घेण्यात यावी.

१४) अटक पंचनामावर आरोपीचे कुटुंबातील सदस्य यांची सही नसल्यास त्याचे अटकेची माहीती त्यांचे कुटुंबातील सदस्य/ मित्र/ तो सांगेल त्या व्यक्तीला देण्यात यावी तसेच आऱोपीत यास अटक करुन कोठे ठेवण्यात आले आहे याची माहीती नातेवाईकांना देण्यात यावी. (**B.N.S.S. कलम ४८)**

१५) आरोपीच्या अटकेची माहीती पदनिर्देशित अधिकारी यांना तात्काळ देणे बंधनकारक आहे.

१६) आरोपीच्या अटकेची माहीती पदनिर्देशित अधिकारी यांना दिले बाबत ठाणे दैनंदिनी/केस ड़ायरी/ अटक रजिस्टरमध्ये नोंदी घेण्यात याव्यात .

१७) अटक आरोपीची त्याच्या अधिवक्त्यांना भेटण्याचा अधिकार असल्याबाबत आरोपीस माहीती द्यावी.

१८) आरोपी **६० वर्षांवरील/विकलांग व्यक्ती** असेल आणि त्यास ३ वर्षांपेक्षा कमी शिक्षेचे गुन्हयात अटक करावयाची असेल तर **पोलीस उप अधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त** यांची **पुर्वपरवानगी घेणे** आवश्यक आहे.

१९) पोलीस अधिकाऱ्याच्या विनंतीवरुन आरोपीची वैद्यकीय तपासणी करणे.(**B.N.S.S.कलम ५१)**

२०) अटक करण्यात आलेल्या आरोपीच्या आरोग्याची व सुरक्षिततेची योग्य काळजी घेणे हे त्या आरोपीचा ताबा असणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे कर्तव्य असेल.

**B.N.S.S. कलम ५६)**

# <u>अटकेबाबत नवीन सूचना/ बदल</u>

**<u>BNSS कलम ३५(३)</u>**

पोलीस अधिकारी, अशा सर्व प्रकरणांमध्ये ज्या व्यक्तीला अटक करणे आवश्यक नाही व उप-कलम (१) अंतर्गत ज्या व्यक्तीविरुद्ध वाजवी तक्रार करण्यात आली आहे, किंवा विश्वासार्ह माहिती प्राप्त झाली आहे किंवा वाजवी संशय आहे की त्याने दखलपात्र गुन्हा केला आहे. अशा व्यक्तीला त्याच्यासमोर किंवा नोटीसमध्ये नमूद केल्याप्रमाणे इतर ठिकाणी हजर राहणेबाबत निर्देश देणारी नोटीस जारी करेल.

**<u>BNSS कलम ३५(४)</u>**

अशी नोटीस कोणत्याही व्यक्तीला जारी केली जाईल, त्या व्यक्तीचे कर्तव्य असेल की तो त्या नोटीसच्या अटींचे पालन करील.

**<u>BNSS कलम ३५(५)</u>**

जेव्हा अशा व्यक्तीने नोटीशीचे पालन केले असेल किंवा पालन करण्याचे चालु ठेवले असेल तेव्हा, अशा व्यक्तीस अटक केली पाहिजे असे पोलीस अधिकाऱ्याचे मत असल्याबाबतची कारणे नोंदविल्याशिवाय विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाच्या बाबतीत अशा व्यक्तीस अटक करता येणार नाही.

**<u>BNSS कलम ३५(६)</u>**

जेव्हा अशी व्यक्ती, कोणत्याही वेळी, नोटीसच्या अटींचे पालन करण्यात अयशस्वी ठरली किंवा स्वतःची ओळख पटवण्यास तयार नसेल, तेव्हा पोलीस अधिकारी, या संदर्भात सक्षम न्यायालयाने दिलेल्या आदेशांच्या अधीन राहून, नोटीसमध्ये नमूद केलेल्या गुन्ह्याचे अनुषंगाने त्याला अटक करू शकतो.

## <u>आरोपीचे अटकेची माहीती देणेबाबत B.N.S.S कलम ३७</u>

१) नियंत्रण कक्ष या ठिकाणी अटक आरोपीची माहीती घेणे करीता सहाय्यक पोलीस उप निरीक्षक (ASI) दर्जा पेक्षा कमी नसेल अशा अधिकारी यांची नेमणुक करण्यात यावी. तसेच संबंधित अधिकारी हा आरोपीचे अटकेबाबत रजिस्टर अद्ययावत ठेवेल व डिजीटल बोर्डद्वारे अटक आरोपीची माहीती देण्यात येईल.

२) अटक आरोपीबाबत, संबंधीत आरोपी पोलीस/न्यायालयीन कोठडीमध्ये आहे याबाबत सविस्तर माहीती प्रत्येक पोलीस ठाण्यात एक पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस उप निरीक्षक (ASI) दर्जा पेक्षा कमी नसेल त्याला पदनिर्देशित करेल जो अटक केलल्या व्यक्तीच्या नावे पत्ते ज्या अपराधाचा दोषारोप लावला आहे, त्या अपराधाचे स्वरुप व त्याची माहीती ठेवण्यास जबाबदार असेल जी प्रत्येक पोलीस ठाण्यात आणि जिल्ह्याच्या मुख्यालयात संगणकीय (डिजीटल) पद्धतीसह विविध पध्दतींचा वापर करुन प्रदर्शित करेल.

## <u>आरोपीस बेडी लावणेबाबत (B.N.S.S कलम ४३(३))</u>

**या कलमान्वये सराईत गुन्हेगार यांना बेडी लावण्यासंबंधी निर्देश देण्यात आले आहेत.**

१) खुनाचा गुन्हा, बलात्काराचा गुन्हा, ॲसिड अॅटॅक, बनावट नाणी व चलनी नोटा, अपहरणाचे गुन्हे, बालकांविरुद्ध लैंगिक अत्याचाराचे व लैंगिक अत्याचाराबातचे गुन्हे, संघटीत गुन्हेगार, दहशतवादी, अंमलीपदार्थ विषयक आरोपी, अवैध शस्त्र बाळगणे संदर्भातील गुन्ह्यातील आरोपी, देशविघातक कृत्यातील आरोपी यांना बेडी/ हथकडी लावण्यात येईल.

## <u>आरोपीचे वैद्यकीय तपासणीबाबत (B.N.S.S कलम ५१)</u>

या कलमाअन्वये आरोपीच्या मेडिकल मेमो वरती संबंधित तपास अधिकारी किंवा ड्युटी ऑफिसर सही करतो. परंतु या कलमान्वये **<u>कोणताही पोलीस अधिकारी</u>** मेडिकल मेमोवरती सही करु शकतो.

**<u>ओळख परेड (B.N.S.S. कलम ५४) –</u>**
प्रमाणे अटक करण्यात आलेल्या आरोपीच्या ओळख परेडचे व्हिडिओ/ऑडिओ रेकॉर्डिंग करण्यात यावे. **तसेच भारतीय साक्ष अधिनियम (B.S.A.) कलम ९ प्रमाणे** ओळख परेड घेण्यात यावी.

# भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३

## प्रकरण १३ - पोलीसांना वर्दी देणे आणि अन्वेषण करण्याचे त्यांचे अधिकार

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता यांचे कायद्यांचा तुलनात्मक तक्ता

| अ.क्र | तपासाची प्रक्रिया | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ B.N.S.S. | फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ Cr.P.C. |
|---|---|---|---|
| १ | दखलपात्र प्रकरणातील वर्दी. | १७३ | १५४ |
| २ | बिनदखली प्रकरणात वर्दी आणि तपास. | १७४ | १५५ |
| ३ | दखलपात्र अपराधांचा तपास करण्याचा अधिकार. | १७५ | १५६ |
| ४ | तपासाची प्रक्रिया (अन्वेषणाची कार्यपद्धती). | १७६ | १५७ |
| ५ | अहवाल कसा सादर करावा. | १७७ | १५८ |
| ६ | अन्वेषण किंवा प्रारंभिक चौकशी करण्याचा अधिकार. | १७८ | १५९ |
| ७ | साक्षीदारांना समक्ष हजर राहण्यास फर्माविण्याचा अधिकार. | १७९ | १६० |
| ८ | पोलीसांनी घ्यावयाची साक्षीदाराची तपासणी. | १८० | १६१ |
| ९ | पोलीसांना दिलेले जबाब स्वाक्षरीत करावयाचे नाहीत त्या जबाबाचा पुराव्यात उपयोग. | १८१ | १६२ |
| १० | कोणतेही प्रलोभन दाखवायचे नाही. | १८२ | १६३ |
| ११ | कबुलीजबाब आणि जबाब नोंदवुन घेणे. | १८३ | १६४ |
| १२ | बलात्कार झालेल्या पिडीत व्यक्तीची वैद्यकीय तपासणी. | १८४ | १६४-अ |
| १३ | पोलीस अधिकाऱ्याने घ्यावयाची झडती. | १८५ | १६५ |
| १४ | एका पोलीस ठाणे अंमलदार अधिकाऱ्याला अशा दुसऱ्या पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याकडे झडती - वॉरंट काढण्याची मागणी केव्हा करता येईल. | १८६ | १६६ |
| १५ | जेव्हा तपास २४ तासात संपत नाही तेव्हा अनुसरावयाची प्रक्रिया. | १८७ | १६७ |
| १६ | कनिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने तपासाचा अहवाल देणे. | १८८ | १६८ |
| १७ | अपुरा पुरावा असेल तेव्हा आरोपीस सोडुन देणे. | १८९ | १६९ |
| १८ | पुरेसा पुरावा असल्यास मॅजिस्ट्रेट कडे केसेस पाठविणे. | १९० | १७० |
| १९ | फिर्यादी साक्षीदारांवर निर्बंध लादता कामा नये. | १९१ | १७१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | **तपासामधील कार्यवाहीचा रोजनामा (केस डायरी).** | १९२ | १७२ |
| २१ | **तपास पुर्ण झाल्यावर दोषारोपपत्र पाठविणे.** | १९३ | १७३ |
| २२ | **आत्महत्या वगैरेबाबत पोलिसांनी चौकशी करणे.** | १९४ | १७४ |
| २३ | **व्यक्तींना समन्स पाठविण्याचा अधिकार.** | १९५ | १७५ |
| २४ | **मृत्युच्या कारणाची दंडाधिकाऱ्याने चौकशी करणे.** | १९६ | १७६ |

## प्रथम खबर (B.N.S.S.) कलम १७३

गुन्ह्याची फिर्याद घेताना, फिर्याद ही यथार्थ डिव्हाईसमध्ये/कॅमेऱ्यामध्ये व्हिडिओ रेकॉर्ड करुन त्याची हॅश व्हॅल्यु प्राप्त करण्यात यावी. सदर व्हिडिओ हा हॅश व्हॅल्यु प्राप्त करुन तो व्हिडिओ पेनड्राईव्ह/सीडी/युएसबी ड्राईव्ह मध्ये घेण्यात यावा.

प्रथम खबर घेताना विलंब झालेबाबत खालील प्रमाणे कारणे नमुद करावीत.

१) फिर्यादी शारिरीक कारणाने आजारी, वयस्कर, अशक्तपणा वगैरेमुळे उशीर झाला.
२) घटनास्थळापासुन पोलीस स्टेशन दुर अंतरावर होते.
३) नैसर्गिक कारणे, वादळ, पाउस वगैरे.
४) फिर्यादी अडाणी, खेडुत त्यामुळे त्याला वेळेचे महत्व समजले नाही.
५) घडलेला गुन्हा उशीरा समजला.

**प्रथम खबर दाखल करताना/जबाब नोंद करताना, हद्द व घटनास्थळ न पहाता दाखल करणे, सदर गुन्हा हा कोणत्याही पोलीस ठाणेचे हद्दीत घडला असला तरी सदर प्रथम खबर माहीती मिळताच तात्काळ दाखल करुन घेणे आवश्यक आहे. (B.N.S.S.कलम १७३ प्रमाणे)**

- प्रथम खबर अहवाल जर इलेक्ट्रॉनिक स्वरुपात प्राप्त झाल्यास, सदर खबर देणाऱ्या फिर्यादीस ३ दिवसांत बोलावुन चौकशी करुन प्रथम खबर दाखल करुन घ्यावी.
- फिर्यादी यांना प्रथम खबरी अहवालाची प्रत द्यावी किंवा प्रथम खबरी अहवालातील पिडीत/बळीत व्यक्ती यांना प्रथम खबर अहवालाची प्रत देण्यात यावी.

## घटनास्थळ पंचनामा - (B.N.S.S.-१७६ )

१) **B.N.S.S. - १७६(१)**
गंभीर गुन्ह्याचे अनुषंगाने अन्वेषण करण्याचा अधिकार प्राप्त झालेला पोलीस अधिकारी/अंमलदार हा स्वत: जातीनिशी घटनास्थळावर जाईल अथवा एका पोलीस अंमलदाराची नियुक्ती करुन घटनास्थळ संरक्षित करुन घेईल.

२) **B.N.S.S. - १७६ (३)**
अन्वये ७ वर्षांवरील शिक्षा असणाऱ्या गुन्ह्याचे घटनास्थळी **फॉरेन्सिक टिम** यांना बोलविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यांचेकडुन भौतिक/जैविक पुरावे प्राप्त करावेत.

३) **B.N.S.S. - १८४** –
मेडिकल प्रॅक्टिशनर ज्यांनी पिडीत/जखमी यांची गुन्ह्याचे अनुषंगाने तपासणी केली आहे. त्यांनी वैद्यकीय अहवाल ०७ दिवसांचे आत तपास अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक आहे.

४) **B.N.S.S. - १९३** –

तपास अधिकारी यांनी ९० दिवसांमध्ये फिर्यादी/ पिडीत यांना केलेल्या तपासाचा प्रगती अहवाल सादर करावा (सदर अहवाल इलेक्ट्रॉनिक स्वरुपात देखील देवु शकतो)

## तपासाबाबत तरतुदी

१) पोलीस ठाण्यात दाखल अदखलपात्र प्रकरणांचे दैनंदिन अहवाल १५ दिवसांत मा. न्यायालयास सादर करण्यात यावेत. **B.N.S.S. कलम - १७४(१)(२)**

२) अपराधाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधिक्षक आवश्यक वाटल्यास पोलीस उप अधिक्षक यांचे करवी अपराधाचे अन्वेषण करवतील. **B.N.S.S. कलम - १७५ (१)**

३) १५ वर्षांखालील व ६० वर्षावरील पुरुष व्यक्तीला, कोणत्याही स्त्रीला, शारिरीक किंवा मानसिक दृष्ट्या विकलांग असलेल्या किंवा तीव्र आजारी असलेल्या व्यक्तीला पोलीस ठाण्यात गुन्ह्याचे चौकशीकामी बोलविण्यात येवु नये, परंतु ते स्वत:हुन पोलीस ठाण्यात हजर राहण्यास इच्छुक असतील तर त्याची चौकशी पोलीस ठाण्यात करता येईल. **B.N.S.S कलम १७९**

४) तपासात कबुली जबाब व जबाब नोंदविणेबाबत **B.N.S.S. कलम - १८३ (१)** सदर जबाब व्हिडिओ व ऑडिओ रेकॉर्डिंग करण्यात यावा.

५) ज्या गुन्ह्यात १० वर्षाच्या कारावासाची किंवा अधिक किंवा आजीव किंवा मृत्युची शिक्षा होवु शकते त्यात पोलीस अधिकाऱ्याकडुन आणण्यात आलेल्या साक्षीदाराचा जबाब न्यायालयासमक्ष नोंद करण्यात यावा. **B.N.S.S. कलम - १८३ (६)**

६) पोलीस अधिकारी **B.N.S.S कलम - १८५** नुसार घेतलेली झडतीचे व्हिडिओ, ऑडिओ रेकॉर्डिंग करतील

७) अन्वेषणातील कार्यवाहीचा रोजनामा (केस डायरी) **B.N.S.S कलम १९२**

A. **कलम - १९२(१)**

केस डायरीमध्ये तपासाची सुरुवात, तपास केव्हा संपला, कोणत्या स्थळांना भेट दिली तपासातील कार्यवाहीची रोजच्या रोज नोंद करतील.

B. **कलम - १९२ (२) -**

साक्षीदारांचे जाब जबाब केस डायरीमध्ये समाविष्ट करतील.

C. **कलम - 192 (3) –**

केसडायरी एका खंडामध्ये (Single Volume) असेल त्यास पृष्ठक्रमांक देण्यात येईल.

## दोषारोपपत्र दाखल करणेबाबत - (B.N.S.S कलम - १९३)

१) महिला व बालकांसंदर्भातील गुन्ह्याचे दोषारोपपत्र गुन्हा दाखल झाल्यापासुन **२ महिन्याचे आत** दाखल करण्यात यावेत. (**B.N.S.**कलम **६४, ६५, ६६, ६७, ६८, ७०, ७१** तसेच पोक्सोमधील कलम **४, ६, ८, १०)**

२) **B.N.S.S कलम - १९३ (३) –**

अन्वेषण पुर्ण होताच पोलीस ठाणे अंमलदार/अधिकारी अपराधाची दखल घेण्याचा अधिकार प्रदान झालेल्या दंडाधिकाऱ्याकडे राज्यशासनाने विहित केलेल्या नमुन्या नुसार वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) संप्रेषासह एक अहवाल पाठवील.

# भारतीय नागरिक सुरक्षा संहितेमधील इतर महत्वाच्या तरतुदी

**B.N.S.S.- १०५** –

एखाद्या ठिकाणाची झडती घेण्याची किंवा कोणतीही मालमत्ता, वस्तु किंवा गोष्ट ताब्यात घेण्याची प्रक्रियेसह शोध आणि जप्ती दरम्यान जप्त केलेल्या सर्व गोष्टींची यादी तयार करणे आणि साक्षीदारांची अशा यादीवर स्वाक्षरी घेणे. याचे चित्रण कोणत्याही ऑडिओ व्हिडिओ वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) माध्यम मोबाईल फोनद्वारे रेकॉर्ड केलेले आहे आणि पोलीस अधिकाऱ्याने असे रेकॉर्डिंग जिल्हा दंडाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांचेकडे विनाविलंब पाठवावे.

**झडती पंचनामा - (B.N.S.S. १८५) –**

पंचनामा करताना व्हिडिओ /ऑडिओ चित्रिकरण करुन सदर व्हिडिओ ऑडिओची हॅश व्हॅल्यु काढावी तसेच तात्काळ ते सिल करुन सदर पंचनामाची एक प्रत प्रथम वर्ग दंडाधिकारी/कार्यकारी दंडाधिकारी/विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावी.

**B.N.S.S.- १८७** –

या कलमांतर्गत आरोपी व्यक्ती ज्या दंडाधिकाऱ्याकडे पाठविली जाते, त्याला खटला चालविण्याचा अधिकार आहे किंवा नाही याची पर्वा न करता, अशी व्यक्ती जामीनावर बंधमुक्त झाली आहे काय किंवा त्याचा जामीन रद्द झाला आहे काय हे विचारात घेवुन वेळोवेळी, अशा दंडाधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा कोठडीत आरोपीला, एकुण १५ दिवसांपेक्षा जास्त नसेल एवढ्या कालावधीसाठी, किंवा काही भांगामध्ये, ६० दिवस किंवा ९० दिवसांच्या अटकेच्या कालावधीपैकी सुरवातीचे ४० दिवस किंवा ६० दिवस कोणत्याही वेळी कोठडीत ठेवण्याची परवानगी दिली जाते आणि जर त्याला खटला चालवण्याचा अधिकार नसेल तर, आणि पुढील कोठडी घेणे अनावश्यक वाटत असेल तर तो आरोपीला अशा अधिकारक्षेत्र असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे पाठविण्याचा आदेश देवु शकतो.

**B.N.S.S.- १९३ (८)** –

खटल्याचा तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने **B.N.S.S. कलम २३०** अन्वये आरोपींना पुरवण्यासाठी दंडाधिकाऱ्याकडे रीतसर अनुक्रमित केलेल्या इतर कागदपत्रांसह पोलीस अहवालाच्या आरोपींच्या संख्येइतक्या प्रति दंडाधिकाऱ्याला सादर केल्या पाहिजेत. त्या वीजकीय (इलेक्टॉनिक) संप्रेषणाद्वारे दिल्याचे ग्राह्य धरले जाईल.

**B.N.S.S.- ३४९** –

कोणत्याही अन्वेषणासाठी कोणत्याही व्यक्तीला तसेच आरोपी व्यक्तीला नमुना स्वाक्षरी किंवा बोटांचे ठसे हस्ताक्षराचा नमुना किंवा आवाजाचा नमुना घेणे गरजेचे आहे अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर, तो तसा आदेश देऊ शकेल आणि संबंधित व्यक्ती नमुना स्वाक्षरी किंवा बोटांचे ठसे हस्ताक्षराचा नमुना किंवा आवाजाचा नमुना देण्यासाठी आदेशाप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या वेळी व ठिकाणी उपस्थित राहील. दंडाधिकारी असा आदेश कोणत्याही व्यक्तीला अटक न करता देऊ शकेल.

**B.N.S.S.- ३९८** –

साक्षीदारांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक राज्यशासन राज्यासाठी साक्षीदार संरक्षण योजना तयार करेल आणि अधिसुचित करेल.

# <u>भारतीय साक्ष अधिनियम, २०२३</u>

भारतीय साक्ष अधिनियम व भारतीय पुरावा कायदा यांचे कायद्यांचा तुलनात्मक तक्ता

| अ.क्र | तपासाची प्रक्रिया | भारतीय साक्ष अधिनियम २०२३ B.S.A. | भारतीय पुरावा कायदा १८७२ I.E.A. |
|---|---|---|---|
| १ | **मेमोरंडम पंचनामा (निवेदन पंचनामा).** | २३ | २७ |
| २ | **जी व्यक्ती मरण पावली आहे किंवा जिचा शोध लागु शकत नाही इत्यादी सारख्या प्रकरणात त्या व्यक्तीने केलेल्या संबंद्ध तथ्याचे कथन हे ज्या मध्ये संबंद्ध असते अशी प्रकरणे (मृत्युपुर्व जबाब).** | २६ A | ३२ (१) |
| ३ | **तज्ञांची मते.** | ३९ | ४५ |
| ४ | **हस्ताक्षर आणि स्वाक्षरीबाबतचे मत केव्हा संबंद्ध.** | ४१ | ४७ |
| ५ | **वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) किंवा अंकात्मक (डिजीटल) अभिलेख.** | ६१ | तरतुद नाही |
| ६ | **वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) अभिलेखाच्या पुराव्यासंबंधी विशेष तरतुदी.** | ६२ | ६५ A |
| ७ | **वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) अभिलेखाची ग्राह्यता.** | ६३ (१) | ६५ B |
| ८ | **आरोपीचा खटला अपवादांतर्गत येतो हे शाबीत करण्याची जबाबदारी.** | १०८ | १०५ |
| ९ | **विवाहित स्त्रीला आत्महत्या करण्यास अपप्रेरणा देण्यासंबंधीचे गृहीतक.** | ११७ | ११३ (A) |
| १० | **हुंडाबळीबाबतचे गृहीतक.** | ११८ | ११३ (B) |
| ११ | **बलात्कारासंबंधीच्या विवक्षित खटल्यामध्ये संमतीच्या अभावा संबंधीचे गृहीतक.** | १२० | ११४ (A) |
| १२ | **स्मृतीला उजाळा देणे.** | १६२ | १५९ |

# <u>चेकलिस्ट क्र:- ०१</u>

## महिला व बालकांविरुद्ध गुन्ह्यांच्या तपासाबाबत मार्गदर्शक प्रश्नावली

नवीन व जुन्या कायद्यांमधील कलमांचा तुलनात्मक तक्ता

| अ.क्र | गुन्ह्याचे स्वरुप | भारतीय न्याय संहिता २०२३ B.N.S. | भारतीय दंड संहिता १८६० I.P.C |
|---|---|---|---|
| | **<u>७ वर्षावरील गुन्हे (अजामिनपात्र)</u>** | | |
| १ | **बलात्काराबाबत शिक्षा** | ६४ (१८ वर्षाखालील पत्नीशी केलेला संभोग हा बलात्कार होईल) | ३७६ (अपवाद १५ वर्षावरील पत्नीसोबत केलेला संभोग हा बलात्कार नव्हता) |
| २ | **०-१६ वर्षाखालील स्त्रीवरील बलात्कारासाठी शिक्षा.** | ६५ (२) **वयाची अट ० - १६ वर्षे आहे.** | ३७६(AB) **(वयाची अट ०-१२ वर्षे होती)** |
| ३ | **पिडीत व्यक्तीचे मृत्युस कारण ठरणे किंवा तिची टिकुन राहणारी वनस्पतीवत अवस्था होण्यात पर्यावसन होणे यासाठी शिक्षा.** | ६६ | ३७६(A) |
| ४ | **प्राधिकार असलेल्या व्यक्तीने लैंगिक समागम करणे.** | ६८ | ३७६(C) |
| ५ | **लग्नाचे खोटे वचन किंवा इतर फसवे मार्ग (नोकरीचे/पदोन्नतीचे/प्रलोक्षन/ओळख लपवुन इ. मार्गाचा वापर करुन लैंगिक समागम करणे.)** | ६९ | तरतुद नाही |
| ६ | **सामुहिक बलात्कार.** | ७० (१) | ३७६(D) |
| ७ | **१८ वर्षाखालील एखादया महिलेवर सामुहिक बलात्कार.** | ७० (२) | ३७६(DA) ३७६(DA) |
| ८ | **पुनरावृत्तीकर्ता अपराध्यांसाठी शिक्षा (वारंवार अपराध करणे).** | ७१ | ३७६(E) |
| ९ | **पती किंवा पत्नी हयात असतानाच्या काळात पुर्वीच्या विवाहाची वस्तुस्थिती लपवुन पुर्नविवाह करणे** | ८२(२) | ४९५ |
| १० | **विवाह इ. ची सक्ती करण्यासाठी एखाद्या स्त्रीचे अपनयन किंवा अपहरण करणे.** | ८७ | ३६६ |
| ११ | **अपराध करण्यासाठी एखाद्या बालकाला भाड्याने घेणे, कामावर ठेवणे किंवा त्यात गुंतवणे.** | ९५ (नविन कलम) | तरतुद नाही |
| १२ | **अज्ञात बालक अनैतिक कृत्यासाठी मिळवणे.** | ९६ | ३६६ (अ) |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | **वेश्या व्यवसाय इ. प्रयोजनांसाठी बालकाची विक्री करणे.** | ९८ | ३७२ |
| १४ | **वेश्या व्यवसाय इ. प्रयोजनासाठी बालकाची खरेदी करणे.** | ९९ | ३७३ |
| १५ | **भिक मागण्यासाठी बालकाचे अपनयन करणे किंवा तिला विकलांग करणे.** | १३९(१)(२)(३) | ३६३(अ) |
| १६ | **खुन करण्यासाठी अपनयन करणे किंवा अपहरण करणे.** | १४० (१) | ३६४ |
| १७ | **खंडणी वगैरे करीता चोरुन नेणे.** | १४० (२) | ३६४(अ) |
| १८ | **परकीय देशातुन मुलगी (वय २१ वर्षे खालील) मुलगा (वय १८ वर्षे खालील) आयात करणे.** | १४१ | ३६६(ब) |
| १९ | **खुन करण्यासाठी किंवा खंडणी इ. मागण्यासाठी अपनयन/ अपहरण करणे.** | १४० (४) | ३६७ |
| | **<u>७ वर्षाखालील गुन्हे (जामिनपात्र)</u>** | | |
| १ | **फारकतीच्या कालावधीमध्ये पतीने पत्नीशी लैंगिक समागम करणे.** | ६७ | ३७६(B) |
| २ | **स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हमला/फौजदारी प्रात्र बलप्रयोग करणे.** | ७४ | ३५४ |
| ३ | **लैंगिक सतावणुक व त्यासाठी शिक्षा.** | ७५ | ३५४ (अ) |
| ४ | **स्त्रीला विवस्त्र करण्याचे हेतुने तिच्यावर हल्ला करणे** | ७६ | ३५४ (ब) |
| ५ | **चोरुन अश्लिल चित्रण करणे.** | ७७ | ३५४ (क) |
| ६ | **छुपा पाठलाग.** | ७८ | ३५४ (ड) |
| ७ | **स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने हावभाव किंवा कृती करणे.** | ७९ | ५०९ |
| ८ | **पालकाने किंवा देखभाल करणा-या व्यक्तीने १२ वर्षांखालील बालकाला उघडयावर टाकणे आणि त्याग करणे.** | ९३ | ३१७ |
| ९ | **मृतदेहाची गुप्तपणे विल्हेवाट लावुन अपत्य जन्माची लपवणुक करणे.** | ९४ | ३१८ |
| १० | **१० वर्षाखालील बालकाच्या अंगावरील मालमत्ता चोरण्याच्या उद्देशाने त्याचे अपनयन किंवा अपहरण करणे.** | ९७ | ३६९ |
| ११ | **अपनयनाबद्दल शिक्षा.** | १३७ (२) | ३६३ |
| १२ | **गुप्तपणे व गैरपणे एखाद्या व्यक्तीला परिरुद्ध करण्यासाठी तिचे अपनयन किंवा अपहरण करणे.** | १४० (३) | ३६५ |

# <u>प्रथम खबर प्रश्नावली</u>

| अ.क्र | प्रश्नावली | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम खबर नोंद करताना फिर्यादीचा सविस्तर जबाब नोंद केला आहे काय ? प्रथम खबर मध्ये तक्रारदार यांचे वय, संपुर्ण पत्ता (सध्या रा. व मुळ रा.) व्यवसाय, मोबाईल क्रमांक, आधार कार्ड क्रमांक व ई-मेल आयडी याचा उल्लेख प्रथम खबरमध्ये केला आहे काय ? | | | |
| २ | प्रथम खबरीतील तक्रारदाराच्या तक्रारीचे **<u>यथार्थमध्ये/कॅमेरामध्ये व्हिडिओ चित्रीकरण</u>** करुन त्याची **<u>हॅश व्हॅल्यु</u>** काढली आहे काय ? | | | |
| ३ | प्रथम खबरमध्ये घटनास्थळ, दिनांक, वेळ नमुद केली आहे काय ? | | | |
| ४ | अत्याचाराची खबर पिडीतेने स्वत: दिली आहे काय? तसेच ती कोणी लिखित केली आहे याबाबत नोंद घेतली आहे काय ? | | | |
| ५ | सदर खबर ही महिला अधिकारी यांचे समक्ष घेण्यात आली आह काय ? | | | |
| ६ | पिडीत स्वत: फिर्यादी नसल्यास ज्यास घटना प्रथम ज्ञात झाली अशी व्यक्ती आहे काय ? असल्यास फिर्यादीमध्ये पिडीतेची त्यावेळच्या स्थितीचा व चेहऱ्यावरील हावभावाचा तसेच अंगावर जखमा झाल्या असल्याचा उल्लेख आहे काय ? | | | |
| ७ | पिडीत महिला ताप्तुरती किंवा कायमस्वरुपी मानसिक किंवा शारिरीकदृष्ट्या अपंग असेल तर अशा पिडीतेचा निवासस्थान किंवा तिचे पसंतीचे ठिकाणी जावुन दुभाषी किंवा विशेष शिक्षण देणाऱ्याचे उपस्थितीत महिला अधिकारी यांनी फिर्यादीचा जबाब नोंदविला आहे काय ? नसल्यास त्याची सविस्तर कारणे नोंद केली आहेत काय ? | | | |
| ८ | पिडीत अल्पवयीन असल्यास वयाचा उल्लेख, तिचा जन्म दाखला/ शाळेचा दाखला प्राप्त करुन तिचे वयाची खात्री केली आहे काय ? | | | |
| ९ | बळीत मुलीचे/स्त्रीचे कपडे फाटले असल्यास किंवा त्याचेवर रक्ताचे, वीर्याचे डाग पडले असल्यास त्यांचा तपशिल घेण्यात आला आहे काय ? | | | |
| १० | पिडीत महिलेने खबर दिली नसल्यास, ती का दिली नाही याबाबतचे सविस्तर कारणांचा फिर्यादीमध्ये उल्लेख करण्यात आला आहे काय ? | | | |
| ११ | प्रथम खबर घेण्यास विलंब झाला आहे काय ? झाला असल्यास विलंबाचे कारण फिर्यादी मध्ये नमुद केले आहे काय ? | | | |
| १२ | प्रथम खबरमध्ये आरोपी व फिर्यादीच्या पुर्वीच्या संबंधाबाबत नेमका उल्लेख केला आहे काय ? | | | |
| १३ | प्रथम खबरमध्ये आरोपीची नावे नमुद आहेत काय ? | | | |
| १४ | आरोपीचे नावे माहीत नसल्यास वर्णन लिहिले आहे काय ? | | | |
| १५ | आरोपी ज्ञात असल्यास त्याचे नाव, पत्ता व इतर तपशील नमुद करण्यात आला आहे काय ? आरोपी अनोळखी असल्याचे त्याचे परिपुर्ण वर्णन | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | घेण्यात येवून ''त्यास मी परत पाहिले असता ओळखेन'' असा फिर्यादीमध्ये उल्लेख करण्यात आला आहे काय ? | | | |
| १६ | प्रथम खबरमध्ये आरोपीने नेमके काय कृत्य केले आहे याचा उल्लेख केला आहे काय ? | | | |
| १७ | पिडीतेस कोणत्या ठिकाणी जखमा झाल्या आहेत याचा उल्लेख फिर्यादीमध्ये केला आहे काय ? | | | |
| १८ | गुन्ह्याचे वेळी आरोपीने काय संभाषण केले, काय बोलले याचा उल्लेख फिर्यादीमध्ये केला आहे काय ? | | | |
| १९ | गुन्ह्यासाठी आरोपीने वापरलेल्या वाहनाचे सविस्तर वर्णन, रंग, वाहन क्रमांक प्रथम खबरी अहवालात नमुद केले आहे काय ? | | | |
| २० | फिर्यादीची भाषा मराठी व्यतिरिक्त असल्यास प्रथम खबर फिर्यादीचे भाषेत समजावुन सांगितली आहे काय ? ती कोणी समजावुन सांगितली याबाबत प्रथम खबरमध्ये नमुद केले आहे काय ? | | | |
| २१ | पिडीतेची खबर नोंदविताना पिडीतेची स्त्री नातेवाईक किंवा मैत्रिण यांचे समक्ष प्रथम खबर नोंदविण्यात आली आहे काय ? | | | |
| २२ | फिर्यादीची प्रथम खबर नोंदविताना महिला दक्षता समितीची सदस्य उपस्थित होते काय ? | | | |
| २३ | पिडीत स्त्री अनुसुचित जाती/जमाती ची सदस्य असल्यास तीची जात फिर्यादीमध्ये मध्ये नमुद केली आहे काय? आरोपीस पिडीत स्त्री ही अनुसुचित जाती/जमातीची आहे हे माहीती असल्याबाबतचा उल्लेख फिर्यादीमध्ये घेतला आहे काय ? | | | |
| २४ | एका पेक्षा जास्त आरोपी असल्यास प्रथम खबरी अहवालामध्ये प्रत्येक आरोपी यांनी केलेल्या कृत्याचे सविस्तर वर्णन नमुद करण्यात आले आहे काय ? | | | |

## घटनास्थळ पंचनामा प्रश्नावली - (B.N.S.S.- १७६)

| अ.क्र | प्रश्नावली | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | घटनास्थळी प्रथम पोहोचणारे अधिकारी/अंमलदार यांनी घटनास्थळ संरक्षित केले आहे काय ? तसेच चित्रीकरण करण्यात आले आहे काय ? | | | |
| २ | घटनास्थळाचा पंचनामा करणेकामी **आय बाईक/आय कार/फॉरेन्सिक टिम** बोलविण्यात आली आहे काय ? | | | |
| ३ | घटनास्थळाचा पंचनामा करताना **यथार्थ ॲपमध्ये/कॅमेऱ्यामध्ये व्हिडिओ चित्रीकरण** करण्यात आले आहे काय ? | | | |
| ४ | व्हिडिओ चित्रीकरणाचे हॅश व्हॅल्यु काढण्यात आली आहे काय ? सदर व्हिडिओ पेनड्राईव्ह/सीडी मध्ये घेण्यात आले आहे काय ? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या हत्यारांचे सविस्तर वर्णन नमुद करण्यात आले आहे काय ? सदर व्हिडिओ पेनड्राईव्ह/सीडी मध्ये घेण्यात आले आहे काय ? | | | |
| ६ | पंचनाम्याकरीता सराईत पंच न घेता सदर गुन्ह्यामध्ये सरकारी/प्रतिष्ठित पंच घेतले आहेत काय ? | | | |
| ७ | घटनास्थळ पंचनाम्यामध्ये फिर्यादी व साक्षीदार यांच्या जागा, प्रकाशाची स्थिती (सुर्य प्रकाश, इलेक्ट्रिक ट्युब इ.) यांचे सविस्तर उल्लेख केलेला आहे काय ? | | | |
| ८ | घटनास्थळ कोणी दाखविले याचा स्पष्ट उल्लेख पंचनाम्यामध्ये करण्यात आला आहे काय ? | | | |
| ९ | घटनास्थळावर मिळुन आलेल्या आरोपीच्या वस्तु, वापरलेले हत्यार याचा घटनास्थळ पंचनामा मध्ये उल्लेख करण्यात आला आहे काय ? | | | |
| १० | फॉरेन्सिक टिम मार्फतीने घटनास्थळावर आवश्यक ते भौतिक/जैविक पुरावे (रक्ताचे डाग, वीर्याचे डाग इ.) ताब्यात घेण्यात आले आहे काय ? | | | |
| ११ | घटनास्थळावरुन आरोपीच्या बोटांचे व पायाचे ठसे प्राप्त केले आहेत काय ? प्राप्त ठशांचे अनुषंगाने तपास करण्यात आलेला आहे काय ? | | | |
| १२ | घटनास्थळाचे निरीक्षण करताना पंचांचे समक्ष घडाळ्याचे काट्याचे दिशेने, विरुद्ध दिशेने, गोलाकार, चौकोनात विभागणी करुन व इतर योग्य पद्धतीने निरीक्षण करुन पंचनामा करण्यात आला आहे काय ? | | | |
| १३ | घटनास्थळावरुन ताब्यात घेण्यात आलेल्या वस्तुबाबत मुद्देमाल पावती फाडण्यात आली आहे काय ? | | | |
| १४ | आरोपीने पिडीतेचे व्हिडिओ, फोटो घेतलेले असल्यास ते पंचनाम्याद्वारे हस्तगत करण्यात आले आहे काय ? | | | |
| १५ | घटनास्थळास वरिष्ठ अधिकारी यांनी भेट दिली आहे काय ? | | | |

## <u>पिडीतेची वैद्यकीय तपासणीबाबत प्रश्नावली (B.N.S.S. कलम १८४)</u>

| अ.क्र | प्रश्नावली | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | पिडीत मुलगी अल्पवयीन असल्यास तिचे जन्मदाखला, शाळेच्या दाखल्या प्रमाणे असलेले वय वैद्यकीय अधिकाऱ्यास अवगत केले आहे काय ? | | | |
| २ | पिडीत मुलीच्या अंगावर जखमा, केस अथवा इतर काही दुवा मिळुन आला आहे काय ? त्याबाबत वैद्यकीय अधिकारी यांचेकडुन सविस्तर अहवाल प्राप्त करण्यात आला आहे काय ? | | | |
| ३ | पिडीत मुलीच्या हातांच्या नखांचे नेल क्लिपिंग घेण्याची विनंती वैद्यकीय अधिकारी यांना केली आहे काय ? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | रासायनिक तपासणी करण्यासाठी पाठविलेल्या वस्तु ताब्यात घेतल्यापासुन लवकरात लवकर तपासणीसाठी पाठविण्यात आल्या आहेत काय ? | | | |
| ५ | जप्त वस्तु रासायनिक प्रयोगशाळेमध्ये नेणाऱ्या अंमलदाराचा जबाब नोंद करण्यात आला आहे काय ? | | | |
| ६ | रासायनिक तज्ञांचा अहवाल विशिष्ट मुद्यांवर मागविण्यात आला आहे काय ? | | | |
| ७ | पिडीतेची गुन्ह्याचे अनुषंगाने वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे काय? | | | |
| ८ | पिडीतेने जन्म दिलेल्या अर्भकाचे रक्त नमुने घेऊन डि.एन.ए. प्रोफायलिंगसाठी पाठविण्यात आले आहे काय ? | | | |
| ९ | पिडीत गर्भवती असल्यास पोटातील अर्भकाचे रक्त नमुने घेऊन डि.एन.ए. प्रोफायलिंगसाठी पाठविण्यात आले आहे काय ? | | | |

## आरोपीचे अटकेबाबत प्रश्नावली

| अ.क्र | प्रश्नावली | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | आऱोपी अटक करताना त्याचा सविस्तर अटक/अंगझडती पंचनामा केला आहे काय ? | | | |
| २ | अंगझडती पंचनाम्या दरम्यान त्याच्या अंगावरील मौल्यवान वस्तु या नातेवाईक यांचे ताब्यात देण्यात आल्या आहेत काय ? त्याबाबत ठाणे दैनंदिनीमध्ये नोंद घेण्यात आली आहे काय ? | | | |
| ३ | पंचनाम्या दरम्यान आरोपीच्या अंगावरील जखमांचे वर्णन तसेच मिळुन आलेल्या वस्तुंचे वर्णन पंचनाम्यात सविस्तर नमुद करण्यात आले आहे काय ? तसेच आरोपीस असणारे जुने आजार व औषधोपचार याबाबत माहीती घेण्यात आली आहे काय ? | | | |
| ४ | कपड्याचा रंग, कपड्याची अचुक स्थिती (फाटलेले अथवा डाग) घेतली आहे काय ? | | | |
| ५ | ताब्यात घेतलेले कपडे व्यवस्थित सील करुन त्यावर पंचांचे सहीचे लेबल लावले आहे काय ? | | | |
| ६ | आरोपीची गुन्ह्याचे अनुषंगाने वैद्यकीय तपासणी केली आहे काय ? | | | |
| ७ | सात वर्ष किंवा त्यापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यामध्ये आरोपीस अटक करणे आवश्यक असल्याबाबत तपास अधिकारी/अंमलदार याची खात्री पटली याबाबत नोंद घेतली आहे काय ? | | | |
| ८ | आरोपी अटकेबाबत ठाणे दैनंदिनी/प्रकरण दैनंदिनी/अटक रजिस्टर मध्ये नोंद घेतली आहे काय ? | | | |
| ९ | आरोपीचे जामीन हक्काबाबत त्याचे विरुद्ध दाखल गुन्हयांची माहीती तसेच अटकेच्या कारणांची माहीती आरोपीस देण्यात आली आहे काय ? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | अटक आरोपीस त्याचे ॲडव्होकेट यांस भेटण्याचा अधिकार असलेबाबत माहीती दिली आहे काय ? | | | |
| ११ | सात वर्षे किंवा त्यापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यामध्ये आरोपीस अटक करणे आवश्यक नसल्यास आरोपीस नोटीस दिली आहे काय ? | | | |
| १२ | अटक पंचनाम्यावर आरोपी तसेच आरोपीताचे नातेवाईकाची सही घेण्यात आली आहे काय ? | | | |
| १३ | आरोपीचे अटकेबाबतची माहीती तसेच अटक करुन कोठे ठेवण्यात आले आहे याबाबत त्याचे नातेवाईक/मित्र/तो सांगेल त्या व्यक्तीस देण्यात आली आहे काय ? | | | |
| १४ | महिला आरोपी यांना महिला अधिकारी/अंमलदार यांचे मार्फतीने अटक केली आहे काय ? | | | |
| १५ | आरोपी विधीसंघर्षग्रस्त बालक असल्यास त्याचेबाबतीत जे.जे.ॲक्ट प्रमाणे कार्यपद्धती वापरण्यात आली आहे काय ? | | | |
| १६ | अटक करतेवेळी पोलीस अधिकारी यांनी ओळख पटवुन दिली आहे काय | | | |
| १७ | अटकेची माहीती नियंत्रण कक्ष येथील पदनिर्देशित अधिकारी यांना देण्यात आली आहे काय ? त्याबाबत ठाणे दैनंदिनी/केस डायरी मध्ये नोंद घेतली आहे काय ? | | | |
| १८ | आरोपीस अटक न करीता नोटीस दिली असल्यास त्याबाबत मा. न्यायालयास माहीती दिली आहे काय ? | | | |
| १९ | ०३ वर्षापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यात विकलांग/ ६० वर्षांपेक्षा जास्त वय असणाऱ्या व्यक्तीस अटक करण्या अगोदर पोलीस उप अधिक्षक/ सहा. पोलीस आयुक्त यांची परवानगी घेतली आहे काय ? | | | |

## ओळख परेडबाबत प्रश्नावली

| अ.क्र | प्रश्नावली | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | आरोपी अनोळखी असल्यास आरोपीची ओळख परेड घेण्यात आली आहे काय ? | | | |
| २ | आरोपी ज्ञात असल्यास परिस्थितीजन्य पुराव्यासाठी, साक्षीदारांसाठी (उदा. लॉजचे, हॉटेलचे व्यवस्थापक, वेटर, नोकर इ.) ओळख परेड घेण्यात आली आहे काय ? | | | |
| ३ | ओळख परेड सर्व नियमांचे पालन करुन विशेष कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत घेण्यात आली आहे काय ? | | | |
| ४ | ओळख परेडचे ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आले आहे काय ? | | | |

## घरझडती पंचनामा प्रश्नावली - (B.N.S.S. १८५)

| अ.क्र | प्रश्न | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | आरोपीची घरझडती पंचनाम्याचे व्हिडिओ व ऑडिओ रेकॉर्डिंग करण्यात आले आहे काय ? | | | |
| २ | तसेच परिस्थितीप्रमाणे दुभाषिक पंच यांचा वापर करण्यात आला आहे काय ? | | | |
| ३ | घरझडती पंचनाम्याचे फोटो काढणारे अधिकारी/अंमलदार व इतर साक्षीदार यांचा जबाब नोंद करण्यात आला आहे काय ? | | | |
| ४ | घरझडती पंचनाम्याचे मोबाईलमध्ये चित्रिकरण अथवा पुराव्याकामी फोटो सादर करणाऱ्या इसमाकडुन व तज्ञांकडुन **B.S.A,कलम ६३ प्रमाणे** प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले आहे काय ? | | | |
| ५ | जप्त करुन ताब्यात घेण्यात आलेल्या वस्तु मुद्देमाल कारकुन यांचेकडे जमा करण्यात आल्या आहेत काय ? तसेच त्याबाबत मुद्देमाल पावती घेतली आहे काय ? | | | |
| ६ | ठाणे दैनंदिनी, मुद्देमाल नोंदवही, इपीआर गुन्हे नोंद वही इ. रजिस्टर मधील नोंदीमध्ये सुसंगती आहे काय ? | | | |
| ७ | सीसीटीव्ही फुटेज जप्त करुन त्याचा सविस्तर पंचनामा करुन **B.S.A,कलम ६३ प्रमाणे** प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले आहे काय ? तसेच त्यांचा जबाब नोंद करण्यात आला आहे काय ? | | | |

## तपासाबाबत प्रश्नावली

| अ.क्र | प्रश्नावली | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | केस डायरीमध्ये तपासाची सुरुवात, तपास केव्हा संपला, कोणत्या स्थळांना भेट दिली तपासातील कार्यवाहीची रोजच्या रोज नोंदी घेतल्या आहेत काय ? | | | |
| २ | तपासदरम्यान घेण्यात आलेले जबाब, टिपण तसेच इतर महत्वाच्या नोंदी जशाच्या तशा केस डायरीमध्ये घेण्यात आल्या आहेत काय ? | | | |
| ३ | केस डायरी ही एका खंडामध्ये (Single Volume) आहे काय ? तसेच तीला पृष्ठ क्रमांक देण्यात आले आहेत काय ? | | | |
| २८ | संस्था/कंपनीने (बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट नुसार बँका किंवा केंद्र/राज्य शासनाचे नियंत्रणातील मंडळे व पतसंस्था वगळुन) गुंतवणुकदारांना ठेव रक्कम मुदतपुर्ण झाल्यावर ठेव रक्कम न केल्यास महाराष्ट्र ठेवीदाराचे संरक्षण कायदा १९९९ या कायद्याचा वापर केला आहे काय ? | | | |
| २९ | संस्थेने/कंपनीने भारतीय रिझर्व बँकेच्या अटी/शर्तीचा भंग केल्यास आर.बी.आय. अ‍ॅक्ट ची कलमे लावण्यात आली आहेत काय ? | | | |
| ३० | कंपनी/संस्था केव्हापासुन सुरु होवुन केव्हा डबघाईस आली याचा उल्लेख केला आहे काय ? | | | |
| ३१ | कंपनी/संस्था CEO, मुख्य व्यवस्थापक, लोन व्यवस्थापक यांनी किती ठेवीदारांच्या किती रक्कमेचा अपहार केला याचा उल्लेख केला आहे काय ? | | | |

## आऱोपीचे अटकेबाबत प्रश्नावली

| अ. नं. | प्रश्न | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | आरोपीस अटक करताना त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे काय ? | | | |
| २ | ७ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यामध्ये आरोपीस अटक करणे आवश्यक असल्याबाबत तपास अधिकारी/अंमलदार याची खात्री पटली आहे काय ? | | | |
| ३ | आरोपी अटकेबाबत ठाणे दैनंदिनी/प्रकरण दैनंदिनी/अटक रजिस्टर मध्ये नोंद घेतली आहे काय ? | | | |
| ४ | आरोपीचे जामीन हक्काबाबत त्याचे विरुद्ध दाखल गुन्हयांची माहीती तसेच अटकेच्या कारणांची माहीती आरोपीस देण्यात आली आहे काय ? | | | |
| ५ | अटक आरोपीला त्याचे अ‍ॅडव्होकेट यांस भेटण्याचा अधिकार असलेबाबत माहीती दिली आहे काय ? | | | |
| ६ | ७ वर्षे किंवा त्या पेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यामध्ये आरोपीस अटक करणे आवश्यक नसल्यास आरोपी यास नोटीस दिली आहे काय ? | | | |
| ७ | आरोपीचा अंगझडती पंचनामा करण्यात आला आहे काय? अटक पंचनाम्यावर आरोपी तसेच आरोपीचे नातेवाईकाची सही घेण्यात आली आहे काय ? | | | |
| ८ | आरोपीचे अटकेबाबतची माहीती तसेच त्यास अटक करुन कोठे ठेवण्यात आले आहे याबाबत त्याचे नातेवाईक/मित्र/तो सांगेल त्या व्यक्तीस देण्यात आली आहे काय ? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | महिला आऱोपीना महिला अधिकारी/अंमलदार यांचे मार्फतीने अटक केली आहे काय ? | | | |
| १० | अटक करतेवेळी पोलीस अधिकारी यांनी ओळख पटवुन दिली आहे काय | | | |
| ११ | अटकेची माहीती नियंत्रण कक्ष येथील पदनिर्देशित अधिकारी यांना देण्यात आली आहे काय? त्याबाबत ठाणे दैनंदिनी/केस डायरी मध्ये नोंद घेतली आहे काय ? | | | |
| १२ | आरोपीस अटक न करीता नोटीस दिली असल्यास त्याबाबत मा. न्यायालयास माहीती दिली आहे काय ? | | | |
| १३ | ०३ वर्षापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यात विकलांग/६० वर्षापेक्षा जास्त वय असणाऱ्या व्यक्तीस अटक करण्यापूर्वी पोलीस उप अधिक्षक/ सहा. पोलीस आयुक्त यांची परवानगी घेतली आहे काय ? | | | |

## घरझडती पंचनामा प्रश्नावली - (B.N.S.S. १८५)

| अ.नं. | प्रश्न | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | गुन्हा नोंद झाल्यानंतर झडती घेण्याचे ठिकाण, जप्त करावयाची कागदपत्रे कोणाकडुन जप्त करावयाची आहेत याबाबत यादी तयार करण्यात आली आहे काय ? | | | |
| २ | पैशाची देवाण घेवाण कोठे व कशी झाली त्या ठिकाणचा घटनास्थळ पंचनामा करण्यात आला आहे काय ? | | | |
| ३ | आरोपी मेमोरंडम पंचनामा करण्याकरीता तयार झाल्यावर पंचांना बोलविण्याकामी ठाणे दैनंदिनीमध्ये नोंद घेण्यात आली आहे काय ? | | | |
| ४ | परिस्थितीप्रमाणे दुभाषिक पंच यांचा वापर करण्यात आला आहे काय ? | | | |
| ५ | जप्त करुन ताब्यात घेण्यात आलेल्या वस्तु या मुद्देमाल कारकुन यांचेकडे जमा करण्याता आला? तसेच त्याबाबदत मुद्देमाल पावती घेतली आहे काय ? | | | |
| ६ | ठाणे दैनंदिनी मुद्देमाल नोंदवही, इपीआर, गुन्हे नोंद वही इ. रजिस्टर मधील नोंदी मध्ये सुसंगती आहे काय ? | | | |

# तपासाबाबत प्रश्नावली

| अ.नं. | प्रश्न | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | केस डायरीमध्ये तपासाची सुरुवात, तपास केव्हा संपला, कोणत्या स्थळांना भेट दिली तपासातील कार्यवाहीची रोजच्या रोज नोंदी घेतल्या आहेत काय ? | | | |
| २ | तपासा दरम्यान घेण्यात आलेले जबाब, पोलीस तपास टिपण तसेच इतर महत्वाच्या नोंदी जशाच्या तशा केस डायरीमध्ये घेण्यात आले आहे काय ? | | | |
| ३ | केस डायरी एका खंडामध्ये (Single Volume) आहे काय ? तसेच तीला पृष्ठ क्रमांक देण्यात आले आहेत काय ? | | | |
| ५ | १० वर्षाच्या कारावासाची किंवा अधिक किंवा आजीव किंवा मृत्युची शिक्षा होवु शकते अशा गुन्ह्यातील साक्षीदाराचा जबाब न्यायालया समक्ष नोंद करण्यात आला आहे काय? | | | |
| ६ | फिर्यादीचे बँक स्टेटमेंट, चेक बुक, बँक पासबुक अथवा इतर तत्सम कागदपत्र फिर्यादीकडुन तपासकामी ताब्यात घेण्यात आली आहेत काय ? | | | |
| ७ | खबर देणाऱ्याने आरोपी सोबत पैशाची देवाणघेवाण करताना हजर असणाऱ्या साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले आहे काय ? | | | |
| ८ | आरोपीने खबर देणाऱ्यास संपर्क केला त्या अनुषंगाने तपास करुन त्याचे पुरावे गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आले आहेत काय ? | | | |
| ९ | हस्ताक्षर तपासणीकरीता हस्ताक्षर नमुने घेण्यात आले आहेत काय ? | | | |
| १० | हस्ताक्षर तपासणी करीता घेण्यात आलेले हस्ताक्षर नमुने हे सी.ए. तपासणीकामी पाठविण्यात आले आहेत काय ? सदर नमुने घेऊन जाण्याऱ्या अंमलदाराचा जबाब नोंद करण्यात आला आहे काय ? | | | |
| ११ | आरोपीने फिर्यादीकडुन पैसे घेऊन त्याबदल्यात दिलेली पावती, पोचपावती, चेक, बाँड, इसार पावती इ. कागदपत्रे खबर देणाऱ्याकडुन हस्तगत करण्यात आली आहेत काय ? | | | |
| १२ | आरोपीने संस्था अगर कंपनी चालु करण्यामागचा उद्देश काय होता याबाबत तपास केला आहे काय ? | | | |
| १३ | आरोपीची संस्था अगर कंपनी असल्यास त्याच्या कार्यलयाचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, रजिस्ट्रेशन क्रमांकाबाबतचे मुळ कागदपत्रे आरोपीकडुन जप्त करण्यात आली आहेत काय ? | | | |
| १४ | संस्था/कंपनीचे मुख्य ऑफिस कोठे आहे, संस्था/कंपनीतुन वेळोवेळी मुख्य ऑफिसकडे रक्कम वर्ग झालेबाबत तपास करण्यात आला आहे काय ? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | संस्था/कंपनीने कार्यालय, प्लॉट, जमीन खरेदी केली असल्यास त्याबाबतची कागदपत्रे हस्तगत केली आहेत काय ? | | | |
| १६ | संस्था/कंपनी कार्यालय भाडे तत्वावर असल्यास त्याबाबतचा दस्तऐवज करारनामा हस्तगत करण्यात आला आहे काय ? | | | |
| १७ | संस्था/कंपनीतील सदस्य व इतर कर्मचाऱ्यांचे जबाब/तपास टिपण नोंद करण्यात आले आहेत काय ? | | | |
| १८ | संस्था चालु करण्यासाठी संस्थापक मंडळाने पैसा कोठुन उभा केला अथवा कंपनीच्या पैशाचे स्त्रोत काय होते, याबाबत तपास करण्यात आला आहे काय ? | | | |
| १९ | पैसे जमा करण्यासाठी सक्षम संस्थेची लेखी परवानगी घेण्यात आली होती काय ? | | | |
| २० | सदर संस्था/कंपनीच्या ऑडिट रिपोर्ट तसेच इन्कमटॅक्स रिपोर्टच्या प्रती हस्तगत केल्या आहेत काय ? | | | |
| २१ | संस्था/कंपनीचे बँक खाते कोण हाताळत होते याबाबत तपास करण्यात आला आहे काय ? | | | |
| २२ | तपासादरम्यान ठेवीदार संकलित करण्यासाठी वृत्तपत्रे व इतर माध्यमांचा वापर झाला आहे काय? याबाबत तपास केला आहे काय ? | | | |
| २३ | इतर गुंतवणुकदार यांचेकडे तपास केला आहे काय ? केला असल्यास प्रथम खबरीमध्ये नमुद असलेल्या मुद्यांबाबत माहीती घेतली आहे काय ? याचा तपास टिपण मध्ये उल्लेख केला आहे काय ? | | | |
| २४ | गुन्ह्यामध्ये संगणक संचाचा वापर झाला असल्यास संगणक तज्ञाकडुन डाटा बॅकअप घेतला आहे काय ? | | | |
| २५ | संगणकाची हार्ड डिस्क तज्ञाकडुन काढुन घेऊन ती पंचनामा करुन जप्त करण्यात आली आहे काय? तसेच BSA कलम ६३ चे प्रमाणपत्र प्राप्त केले आहे काय ? | | | |
| २६ | फिर्यादीने आरोपीला ज्यावेळी रक्कम दिली, त्यावेळची रेकॉर्डिंग अथवा व्हिडिओ चित्रीकरण हस्तगत करुन त्याची हॅश व्हॅल्यु काढुन **B.S.A कलम ६३** प्रमाणपत्र हस्तगत केले आहे काय ? | | | |
| २७ | हिशोब अगर इतर नोंदींचा दस्तऐवज मिळविण्यात आला आहे काय ? सदर दस्तऐवज मिळुन आल्यास पंचनाम्यात कोणाचे हस्ताक्षर आहे याचा उल्लेख करण्यात आला आहे काय ? | | | |
| २८ | संस्था/कंपनीमध्ये अभिलेख जप्त करताना ठेवीदार नोंद वही प्रमाणपत्र, कॅश बुक, जमा खर्च बुक, अकाउंट कॅश बुक, रजिस्टर किर्द, खतावणी, ताळेबंद रजिस्टर हे क्रमवारीने प्रथम पासुन ते अखेरपर्यंत क्रमाने लावुन एका पंचनाम्यामध्ये एका प्रकारचे रजिस्टर या पध्दतीने करण्यात आले आहे काय ? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | संस्था/कंपनी मालमत्तेच्या जप्तीबाबत जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर केला आहे काय ? | | | |
| ३० | संस्था/कंपनीचे बँक खाते गोठविले अगर कसे? त्यावेळी जमा बाबीस मज्जाव करण्यात आला आहे काय? तसा संबंधीत बँकेशी पत्र व्यवहार करण्यात आला आहे काय ? | | | |
| ३१ | संस्था/कंपनी वार्षिक निरीक्षण अहवाल ऑडिट कोणी केले याबाबत तपास करुन त्याच्या साक्षांकित प्रती हस्तगत करण्यात आली आहे काय ? | | | |
| ३२ | संस्था/कंपनीच्या ठेवीच्या रक्कमांचा संचालक मंडळाने गैरवापर केला याबाबतचा पुरावा हस्तगत केला आहे काय ? | | | |
| ३३ | ॲडव्हान्स व कर्ज घेणारे यांचे मालमत्तेवर बोजा चढविणेबाबत संबंधीत तलाठी यांना (प्रत जिल्हाधिकारी व प्रांत अधिकारी) पत्र व्यवहार करण्यात आला आहे काय ? | | | |
| ३४ | संस्था/कंपनीमध्ये एकुण किती कर्मचारी कार्यरत होते त्याबाबत मस्टर घेण्यात आले आहे काय ? | | | |
| ३५ | संस्था/कंपनीमध्ये कर्मचारी यांना दिला जाणारा पगार कोणत्या स्वरुपात म्हणजेच रोखीने अगर चेकने याबाबत तपास केला आहे काय ? | | | |
| ३६ | चेकने पगार दिला असल्यास सदर चेक कोणत्या बँकेचे होते व अकाउंट क्रमांक प्राप्त केला आहे काय ? | | | |
| ३७ | सदर बँकेकडुन खाते उतारे या सत्यप्रती करुन हस्तगत करण्यात आले आहे काय ? | | | |
| ३८ | बँकेकडे संस्था अगर कंपनीचे किती रक्कम शिल्लक आहे? याबाबतची माहीती घेतली आहे काय ? | | | |
| ३९ | संस्था/कंपनीची जागा व कार्यलयाची जागा स्वत:चे मालकीची होती किंवा भाड्याची होती या अनुषंगाने तपास करुन अभिलेख हस्तगत करण्यात आले आहे काय ? | | | |
| ४० | संस्था/कंपनी ऑफिस कर्मचारी नेमताना त्याचे मुलाखतीसाठी वृत्तपत्राममध्ये जाहिरात देण्यात आली होती काय? याचे मुलाखती घेतल्या असतील तर त्या कोणी घेतल्या याबाबत तपास करुन संबंधीत कागदपत्रे पंचनामा करुन जप्त करण्यात आली आहेत काय ? | | | |
| ४१ | संस्था/कंपनीच्या प्रत्येक वर्षांचा ताळेबंदाप्रमाणे किती रक्कम जमा व खर्च केली याचा एकत्रित अहवाल जमा केले आहेत काय ? | | | |
| ४२ | संस्था/कंपनीचे प्रोसिडिंग बुक जप्त केले आहे काय? कंपनी स्थापन करण्याबाबत ठराव पास झाला आहे काय ? | | | |
| ४३ | नॉन बँकिंग कंपनी बाबत कंपनी संस्थेस रिझर्व बँकेचे लायसन्स आहे | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | काय याबाबत तपास केला आहे काय ? | | | |
| ४४ | एजंट कडुन तसेच खातेदार यांचेकडुन त्यांचेकडे चौकशी करुन टिपण नोंदवुन तपासाची साखळी तयार केली आहे काय ? | | | |
| ४५ | हस्ताक्षर, हार्ड डिस्क, सी.डी. प्राप्त करुन तपासणी अभिप्रायासाठी हस्तगत केले आहे काय ? | | | |
| ४६ | कंपनी/संस्थेने गुंतवणुकीसाठी माहीती पुस्तिका तयार केली असल्यास ती जप्त करण्यात आली आहे काय? सदर माहीती पुस्तिका बनविणाऱ्याचे टिपण घेण्यात आले आहे काय ? | | | |
| ४७ | संस्था/कंपनीने ठेवी विकासासाठी सेमिनार बैठक आयोजित केल्या ठिकाणी मालक, मॅनेजर कर्मचारी यांचेकडे तपास केला आहे काय ? | | | |
| ४८ | संस्था/कंपनीने ठेवी विकासासाठी सेमिनार बैठक आयोजित केल्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे होते काय असल्यास त्या संदर्भाने ते फुटेज जप्त केले आहे केला आहे काय ? | | | |
| ४९ | गुंतवणुकदारांना काही रक्कम परत मिळाली आहे काय? मिळाले असल्यास सदर रक्कम ही रोखीने किंवा चेकने मिळाली याबाबत तपास केला आहे काय ? | | | |
| ५० | पैसे चेकने मिळाले असल्यास तो चेक कोणत्या बँकेचा होता, त्यावर कोणाची स्वाक्षरी होती याबाबत तपास करण्यात आला आहे काय ? | | | |
| ५१ | आर्थिक गुन्हे शाखेकडुन गुन्हा दाखल होण्यासाठी दिल्या जाणाऱ्या पत्राचा जावक क्रमांक प्रथम खबरमध्ये नमुद करण्यात आला आहे काय ? | | | |
| ५२ | मोठ्या आर्थिक गुन्ह्यातील आरोपी बाहेर देशात पळुन जाण्याची शक्यता असल्यास संबंधीत यंत्रणांना दक्ष राहण्याबाबत कळविले आहे काय ? | | | |
| ५३ | संशयीताचे नमुना, हस्ताक्षर, नमुना दस्ताऐवज, नैसर्गिक हस्ताक्षराचे कागदपत्रे हस्तगत करण्यात आली आहेत काय ? | | | |
| ५४ | कॅश फ्लो चार्ट तयार करण्यात आला आहे काय ? | | | |
| ५५ | चार्टड अकाउंटंटची मदत घेण्यात आली आहे काय ? | | | |
| ५६ | वैद्यकीय अधिकारी, हस्ताक्षर तज्ञ, सायबर एक्सपर्ट, इतर विषयातील विविध तज्ञ यांचेकडुन अहवाल प्राप्त केले आहेत काय ? | | | |
| ५७ | संशयीतांना BNSS ३५ (३) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे काय ? | | | |
| ५८ | आरोपीस अटकेपुर्वी कॅलेंडर ऑफ इव्हिडन्स असणे आवश्यक आहे | | | |
| ५९ | नॉन बँकिंग कंपनीबाबत त्यांचे लायसन्स आह काय? ते प्राप्त केले आहे काय ? | | | |
| ६० | MPID कायद्यान्वये सक्षम अधिकाऱ्याकडे प्रस्ताव सादर करुन कंपनी/संस्थेच्या संचालकांच्या मालमत्तेची सविस्तर माहीती द्यावी. | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६१ | कंपनी/संस्थेने त्यांचे नावे घेतलेल्या मालमत्तेची माहीती गोळा करावी. | | | |
| ६२ | सर्व संचालक यांचे पॅनकार्ड माहीती घेऊन प्राप्तीकर विभागाकडुन त्यांचे आर्थिक व्यवहार यांची माहीती घेतली आहे काय ? | | | |
| ६३ | कंपनी/संस्था याची खाती असणारी बँकेकडुन मेमोरंडम ऑफ आर्टिकल व मेमोरंडम ऑफ असोशिएशन घेण्यात आले आहे काय | | | |
| ६४ | कंपनी/संस्थाचे एकुण किती एजंट तपासले, किती खातेदार तपासले ? या तपासातुन एजंट खातेदार आणि कंपनी यांचेमध्ये पुराव्यांची साखळी तयार झाली आहे काय ? त्या अनुषंगाने तपास केला आहे काय ? | | | |
| ६५ | कर्ज प्रकरण मंजुर केल्यानंतर प्रोसिडिंग फी योग्य खात्यावर होत होती का ? त्याबाबत तपास केला आहे काय ? | | | |
| ६६ | संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक, जवळचे मित्रमंडळ यांचे व्यवहाराबाबत तपास करावा बँक स्टेटमेंट्सचा तपास केला आहे काय | | | |
| ६७ | मोबाईल जप्त केला असल्यास सरकारी पंच, सायबर एक्सपर्ट समक्ष पंचनामे सिल सहीत मोबाईल जप्त केला आहे काय? आवश्यकते प्रमाणे आरोपी वापरत असलेल्या ई मेल चा पंचनामा स्वतंत्र करावा सायबर एक्सपर्ट व सरकारी पंच घेतले आहेत काय ? सोशल मिडीया ALC व Chat पंचनामा केला आहे काय ? | | | |
| ६८ | संस्था संचालक यांच्या अन्य फर्म/कंपनी/संस्था असतील तर अपहरीत रकमांच्या फ्लो काढावा तसेच सदर तसेच सदर फर्मचे संस्थापक व संचालक यांच्या जबाबदारी निश्चित केल्या आहेत काय ? | | | |

## दोषारोपपत्र दाखल करणेबाबत प्रश्नावली - (B.N.S.S कलम - १९३)

| अ.नं. | प्रश्न | होय | नाही | लागु नाही |
|---|---|---|---|---|
| १ | दोषारोपपत्र दाखल करतेवेळी वीजकीय संदेशामार्फत (सीडी. पेनड्राईव्ह इतर इलेक्ट्रॉनिक साधने) मा. न्यायालयास एक प्रत सादर केली आहे काय ? | | | |
| २ | गुन्ह्याचे तपासात विधी अधिकारी यांची मदत घेतली आहे काय ? | | | |
| ३ | दोषारोप पत्र दाखल करणेकामी सनियंत्रण समितीची मंजुरी घेतली आहे काय ? | | | |
| ४ | गुन्ह्याच्या कागदपत्रांची छाननी करुन पुराव्यांच्या आधारे गुन्ह्याचे अ, ब, क वर्गीकरण किंवा ॲबेटेड समरी किंवा दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे काय ? | | | |
| ५ | गुन्ह्याची माहीती सीसीटीएनएस प्रणालीमध्ये भरण्यात आलेली आहे काय | | | |

# संघटीत व किरकोळ गुन्हेगारीबाबत नवीन तरतुदी

## (B.N.S. कलम १११ व ११२)

| अ नं | गुन्ह्याचे स्वरुप | भारतीय न्याय संहिता २०२३ (B.N.S.) |
|---|---|---|
| | **७ वर्षावरील गुन्हे (अजामिनपात्र)** | |
| १ | संघटीत गुन्हेगारी कृत्यामुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यु झाला असेल. | १११(२)(a) |
| २ | संघटीत गुन्हेगारी कृत्यामुळे मृत्यु सोडुन इतर कोणतेही प्रकरण. | १११(२)(b) |
| ३ | संघटीत गुन्हेगारी करण्यास अपप्रेरित करील, प्रयत्न करेल, षडयंत्र रचेल/जाणीवपुर्वक मदत करेल/अन्यथा संघटित गुन्हयाची तयारी करणा-या कोणत्याही कृतीत गुंतेल. | १११(३) |
| ४ | संघटीत गुन्हेगारी सदस्य असणे. | १११(४) |
| ५ | संघटीत गुन्हेगारी केलेल्या व्यक्तीला आसरा देणे किंवा लपवुन ठेवणे. (अपवाद-पती-पत्नी आसरा देण्यामध्ये येत नाहीत). | १११(५) |
| ६ | संघटीत गुन्हेगारी करुन मिळविलेली/प्राप्त केलेली मालमत्ता/कमाई कब्जात ठेवणे. | १११(६) |
| ७ | संघटीत गुन्हेगारी संघाच्या सदस्याच्या वतीने जंगम/स्थावर मालमत्ता कब्जात ठेवेल ज्याचे त्याला समाधानकारक उत्तरे देता येणार नाही. | १११(७) |
| | **७ वर्षाखालील गुन्हे (जामिनपात्र)** | |
| १ | किरकोळ संघटित गुन्हेगारी करणे. | ११२ |
| २ | कोणतीही व्यक्ती अथवा व्यक्तीच्या समुहाने एखाद्या संघटित गुन्हेगारी संघाचा एक सदस्य म्हणुन संघाच्या वतीने, एकटयाने/ संयुक्तपणे हिंसा, हिंसाचाराची धमकी, धमकावणे धाकदपटशहा किंवा इतर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाने आर्थिक लाभासह इतर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष भौतिक लाभ प्राप्त करण्यासाठी अपहरण, दरोडा, वाहन चोरी, खंडणी, जमीन हडप करणे, सुपारी घेऊन आत्महत्या करणे, आर्थिक अपराध, सायबर गुन्हे व्यक्तींची औषधे, शस्त्रे किंवा बेकायदेशीर वस्तु आणि सेवा, मानवी तस्करी वेश्याव्यवसायसाठी/ खंडणीसाठी मानवी तस्करीसह कोणतीही सतत कृती केल्यास ती संघटित गुन्हेगारी ठरेल. | १११(१) |

## दहशतवादी कृत्य बाबत नविन तरतुद (B.N.S. कलम ११३)

- कलमांतर्गत केस दाखल करावयाचा निर्णय हे पोलीस अधीक्षक दर्जाच्या कमी हुद्दा नसलेल्या अधिक-याने घ्यावयाचा आहे

| | | |
|---|---|---|
| १ | दहशतवादी कृत्यामुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यु झाला असेल. | ११३(२)(a) |
| २ | दहशतवादी कृत्यामुळे मृत्यु सोडुन इतर कोणतेही प्रकरण. | ११३(२)(b) |
| ३ | दहशतवादी कृत्य करण्यास कट रचेल/षडयंत्र रचेल/त्याची वकीली करणे/अपप्रेरणा देणे/सल्ला देणे/प्रोत्साहीत करणे/थेट अथवा जाणीवपुर्वक मदत करणे/करण्याची तयारी करणे. | ११३(३) |
| ४ | दहशतवादी कृत्यांसाठी कारवायांचे प्रशिक्षण देण्यासाठी शिबीरांचे आयोजन करेल/कोणत्याही व्यक्तींची भरती करेल. | ११३(४) |
| ५ | दहशतवादी कृत्यात सहभागी असेल अशा संघटनेचा सदस्य असणे. | ११३(५) |
| ६ | दहशतवादी कृत्य केलेल्या व्यक्तीला आसरा देणे किंवा लपवुन ठेवणे (अपवाद-पती-पत्नी आसरा देण्यामध्ये येत नाहीत). | ११३(६) |
| ७ | संघटीत गुन्हेगारी करुन मिळविलेली/प्राप्त केलेली, संपादन केलेली मालमत्ता/कमाई कब्जात ठेवणे. | ११३(७) |

# अनुसुचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम प्रमाणे गुन्हे दाखल करताना सोबत भारतीय न्याय संहितेचे कलम

| अ. नं | तपासाची प्रक्रिया | भारतीय न्याय संहिता २०२३ B.N.S. | अ.जा.ज.अ.प्र. क चे सुधारित कलमे |
|---|---|---|---|
| १ | खुन. | ३०१(१) | ३(२)(v) |
| २ | खुनाचा प्रयत्न. | १०९ | ३(२)(v) |
| ३ | बलात्कार. | ६४ | ३(१)(w)(i)(ii), ३(२)(v) |
| ४ | दरोडा. | ३१०(१) | ३(२) (v) |
| ५ | दंगा. | १९१(२) | ३(१)(r)(s) |
| ६ | दुखापत, गंभीर दुखापत. | ११८(१), ११७(२), | ३(१)(r)(s), ३(२)(va) |
| ७ | प्राणघातक शस्त्राने गंभीर दुखापत. | ११८(२) | ३(१)(r)(s), ३(२)(v) |
| ८ | पळवुन नेणे. | १३७(२), ८७ | ३(२)(va) |
| ९ | विनयभंग. | ७४ | ३(१)(w)(i)(ii),३(२)(va) |
| १० | विटंबना, नुकसान करणे. | २९८, ३२४(४) | ३(१)(r)(s) |
| ११ | जाळपोळ करणे. | ३२६(g) | ३(२)(v)(t) |
| १२ | जातीवाचक शिवीगाळ करणे, दमदाटी, अपमानीत करणे. | भारतीय न्याय संहिता या कायद्यामध्ये तरतुद नाही | ३(१)(r)(s) |
| १३ | अनु.जाती/जमातीचे व्यक्तीचे जमिनीवर कब्जा करणे. | | ३(१)(f), ३(१)(g) |
| १४ | अनु.जाती/जमातीचे व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकारणे, प्रतिबंध करणे. | | ३(१)(y) |
| १५ | अनु.जाती/जमातीचे व्यक्तीस घर गाव सोडण्यास भाग पाडणे. | | ३(१)(z) |
| १६ | अनु.जाती/जमातीचे व्यक्तीचे पाणवठयाचे, जलाशयाचे पाणी दुषित करणे. | | ३(१)(x) |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | मतदान करण्यास जबरदस्ती करणे. | | ३(१)(I) |
| १८ | सामाजिक, आर्थिक बहिष्कार टाकणे. | भारतीय न्याय संहिता या कायद्यामध्ये तरतुद नाही | ३(१)(z-c) |
| १९ | अनु.जाती जमातीचे व्यक्तीस खाण्यायोग्य नसलेला पदार्थ खाण्याची किंवा पिण्याची जबरदस्ती करणे. | | ३(१)(va) |
| २० | अनु.जाती जमातीचे व्यक्तीच्या गळयात पादत्रानाची माळ घालणे, नग्न अवस्थेत किंवा अर्धनग्न अवस्थेत धिंड काढणे. | | ३(१)(d) |
| २१ | बालकांचे लैंगिक अपराधांपासुन संरक्षण अधि. २०१२. | १२ | ३(१)(w)(i)(ii),३(२)(va) |
| २२ | बालकांचे लैंगिक अपराधांपासुन संरक्षण अधि. २०१२. | ४, ८ | ३(१)(w)(i)(ii),३(२)(v) |

## अदखलपात्र गुन्ह्याबाबत कलमांचे स्वरुप (N.C.)

| अ.नं. | तक्रारीचे स्वरुप | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ B.N.S.S. | भारतीय दंड संहिता १८६० I.P.C. |
|---|---|---|---|
| १. | इच्छापुर्वक दुखापत पोहोचवणे. | ११५(२) | ३२३ |
| २. | शांतताभंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे. | ३५२ | ५०४ |
| ३. | फौजदारीपात्र धाकदपटशा (दमदाटी/धमकी). | ३५१(२)(३) | ५०६ |
| ४. | अब्रुनुकसानी बद्दल. | ३५६(२) | ५०० |
| ५. | निनावी (मोबाईलद्वारे) संदेशाद्वारे फौजदारीपात्र धाकदपटशा. | ३५१(४) | ५०७ |
| ६. | लोकसेवक सार्वजनिक कार्ये पार पाडत असता अटकाव करणे. | २२१ | १८६ |
| ७. | लोकसेवकाला सहाय्य देणे विधितः बंधनकारक असताना सहाय्य देण्याचे टाळणे. | २२२ | १८७ |
| ८. | आत्महत्या करण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न करणे किंवा कायदेशीर अधिकार वापरण्यास विरोध करणे (लोकसेवकाला). | २२६ | तरतुद नव्हती |
| ९. | मालमत्तेचा अप्रामाणिक अपहार करणे. | ३१४ | ४०३ |
| १०. | आगळीक करणे (क्षती किंवा नष्ट करणे). | ३२४ (४) | ४२७ |
| ११. | चलनी नोटा किंवा बँक-नोटा यांसारखे दिसणारे दस्तऐवज बनविणे किंवा वापरणे. | १८२(१) (२) | ४८९(ड) |

**पोलीस अधिका-यास एन.सी प्रकरणात न्याय दंडाधिका-याचे परवानगीने तपास करता येईल B.N.S.S. कलम १७४(२).**

## भारतीय न्याय संहिता २०२३ या कायद्यामधील ०७ वर्षापेक्षा जास्त शिक्षा असणारे कलमांचे वर्गीकरण

**( सदर गुन्ह्यात फॉरेन्सिक टिमने भेट देणे बंधनकारक आहे. )**

| अ.नं. | गुन्ह्याचे स्वरुप | भारतीय न्याय संहिता २०२३ (B.N.S) | भारतीय दंड संहिता १८६० (I.P.C) |
|---|---|---|---|
| १ | **बलात्काराबाबत शिक्षा** | ६४ (१८ वर्षाखालील पत्नीशी केलेला संभोग हा बलात्कार होईल) | ३७६ (अपवाद १५ वर्षावरील पत्नीसोबत केलेला संभोग हा बलात्कार नव्हता) |
| २ | **०-१६ वर्षाखालील स्त्रीवरील बलात्कारासाठी शिक्षा** | ६५(२) वयाची अट ०-१६ वर्षे आहे. | ३७६(AB) (वयाची अट ०-१२ वर्षे होती) |
| ३ | **पिडीत व्यक्तीचे मृत्युस कारण ठरणे किंवा तिची टिकुन राहणारी वनस्पतीवत अवस्था होण्यात पर्यावसन होणे यासाठी शिक्षा** | ६६ | ३७६ (A) |
| ४ | **प्राधिकार असलेल्या व्यक्तीने लैंगिक समागम करणे** | ६८ | ३७६ (C) |
| ५ | **लग्नाचे खोटे वचन किंवा इतर फसवे मार्ग (नोकरीचे/पदोन्नतीचे/प्रलोक्षन/ओळख लपवुन इ.) मार्गाचा वापर करुन लैंगिक समागम करणे** | ६९ | तरतुद नाही |
| ६ | **सामुहिक बलात्कार** | ७० (१) | ३७६ (D) |
| ७ | **१८ वर्षाखालील एखादया महिलेवर सामुहिक बलात्कार** | ७० (२) | ३७६(DA) ३७६(DA) |
| ८ | **पुनरावृत्तीकर्ता अपराध्यांसाठी शिक्षा (वारंवार अपराध करणे)** | ७१ | ३७६ (E) |
| ९ | **हुंडाबळी** | ८०(२) | ३०४(ब) |
| १० | **एखाद्या पुरुषाने कायदेशीर विवाह झाल्याचा समज लबाडीने निर्माण करुन दाम्पत्य भावाने सहवास घडवुन आणणे** | ८१ | ४९३ |
| ११ | **पती किंवा पत्नी हयात असतानाच्या काळात पुर्वीच्या विवाहाची वस्तुस्थिती लपवुन पुर्नविवाह करणे** | ८२(२) | ४९५ |
| १२ | **विवाह इ.ची सक्ती करण्यासाठी एखाद्या स्त्रीचे अपनयन किंवा अपहरण करणे** | ८७ | ३६६ |
| १३ | **अपराध करण्यासाठी एखाद्या बालकाला भाड्याने घेणे, कामावर ठेवणे किंवा त्यात गुंतवणे** | ९५ (नविन कलम) | तरतुद नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | **अज्ञात बालक अनैतिक कृत्यासाठी मिळवणे** | ९६ | ३६६ (अ) |
| १५ | **वेश्या व्यवसाय इ. प्रयोजनांसाठी बालकाची विक्री करणे** | ९८ | ३७२ |
| १६ | **वेश्या व्यवसाय इ. प्रयोजनासाठी बालकाची खरेदी करणे** | ९९ | ३७३ |
| १७ | **भिक मागण्यासाठी बालकाचे अपनयन करणे किंवा तिला विकलांग करणे** | १३९(१)(२)(३) | ३६३(अ) |
| १८ | **खुन करण्यासाठी अपनयन करणे किंवा अपहरण करणे** | १४० (१) | ३६४ |
| १९ | **खंडणी वगैरे करीता चोरुन नेणे** | १४०(२) | ३६३(अ) |
| २० | **परकीय देशातुन मुलगी(वय २१ वर्षे खालील/मुलगा (वय १८ वर्षे खालील) आयात करणे** | १४१ | ३६६(ब) |
| २१ | **खुन करण्यासाठी किंवा खंडणी इ. मागण्यासाठी अपनयन/अपहरण करणे** | १४० (४) | ३६७ |
| २२ | **स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भपात घडवुन आणणे** | ८९ | ३१३ |
| २३ | **गर्भस्त्राव घडवुन आणण्याच्या उद्देशाने केलेल्या कृतीमुळे मृत्यु घडवुन येणे** | ९०(१) | ३१४ |
| २४ | **गर्भस्त्राव घडवुन आणण्याच्या उद्देशाने स्त्रीच्या संमतीशिवाय केलेल्या कृतीमुळे मृत्यु घडवुन येणे** | ९०(२) | ३१४ |
| २५ | **बालक जिवंत जन्माला येण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा जन्मानंतर त्याचा मृत्यु घडवुन आणण्याच्या उद्देशाने केलेली कृती** | ९१ | ३१५ |
| २६ | **सदोष मनुष्यवध या सदरात मोडणाऱ्या कृतीव्दारे स्पंदन पावणाऱ्या अजात गर्भजीवाचा मृत्यु घडवुन आणणे** | ९२ | ३१६ |
| २७ | **अपराध करण्यासाठी एखाद्या बालकाला भाड्याने घेणे, कामावर ठेवणे किंवा त्यात गुंतवणे** | ९५ **(नवीन कलम)** | तरतुद नाही |
| २८ | **बालकास किंवा मनोविकल इसमास आत्महत्या करण्याकरीता चिथावणी देणे** | १०७ | ३०५ |
| २९ | **आत्महत्येला अपप्रेरणा देणे** | १०८ | ३०६ |
| ३० | **खुनाबद्दल शिक्षा** | १०३ (१) | ३०२ |
| ३१ | **पाच किंवा अधिक व्यक्ती एकत्रितपणे वंश, जात, जमात, लिंग, जन्माचे ठिकाण, भाषा, वैयक्तिक विश्वास किंवा इतर कोणत्याही तत्सम कारणात्सव खुन करील (Mob Lynching)** | १०३ (२) **(नवीन कलम)** | तरतुद नव्हती |
| ३२ | **जन्मठेप कैद्यांनी केलेल्या खुनाबद्दल शिक्षा** | १०४ | ३०३ |
| ३३ | **खुन या सदरात न मोडणाऱ्या सदोष मनुष्यवधाबद्दल शिक्षा** | १०५ | ३०४ |
| ३४ | **बालकाच्या किंवा मानसिक आजारी व्यक्तीच्या आत्महत्येस अपप्रेरणा देणे** | १०७ | ३०५ |
| ३५ | **आत्महत्येस अपप्रेरणा देणे** | १०८ | ३०६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | **खुनाचा प्रयत्न करणे** | १०९(१) | ३०७ |
| ३७ | **अपराध करणारी एखादी व्यक्ती आजीवन कारावासाची शिक्षा भोगत असेल त्याप्रकरणात जर दुखापत घडुन आणली तर** | १०९(२) | ३०७ |
| ३८ | **सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे** | ११० | ३०८ |
| ३९ | **ईच्छापुर्वक जबर दुखापत पोचवताना सदर व्यक्ती कायमची अपंग झाली/वनस्पतीवत अवस्था झाली** | ११७(३) | ३२५ |
| ४० | **घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापुर्वक जबर दुखापत पोहोचवणे** | ११८ (२) | ३२६ |
| ४१ | **मालमत्ता जबरीने घेण्यासाठी किंवा अवैद्य कृती करण्यास जबरी भाग पाडण्यासाठी इच्छापुर्वक दुखापत पोहोचवणे** | ११९ (१) | ३२७ |
| ४२ | **मालमत्ता जबरीने घेण्यासाठी किंवा अवैद्य कृती करण्यास जबरी भाग पाडण्यासाठी इच्छापुर्वक जबर दुखापत पोहोचवणे** | ११९ (२) | ३२९ |
| ४३ | **कबुली जबाब जबरीने घेण्यसाठी अथवा मालमत्ता परत करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापुर्वक जबर दुखापत पोहोचवणे** | १२०(२) | ३३१ |
| ४४ | **अपराध करण्याचे उद्देशाने विष, इत्यादीच्या सहाय्याने दुखापत पोहोचवणे** | १२३ | ३२८ |
| ४५ | **ॲसिड इ. वापर करुन इच्छापुर्वक जबर दुखापत करणे** | १२४ (१) | ३२६ (अ) |
| ४६ | **लोकसेवकाला त्याच्या कर्तव्यापासुन धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापुर्वक जबर दुखापत पोहोचवणे** | १२१(२) | ३३३ |
| ४७ | **चोरी करण्यासाठी मृत्यु,दुखापत किंवा निरोध घडवुन आणण्याची पुर्वतयारी करुन चोरी करणे** | ३०७ | ३८२ |
| ४८ | **बलाद्ग्रहण करण्यासाठी एखादया व्यक्तीला मृत्यु घडवुन आणण्याइतपत जबर दुखापत करण्याची भीती घालील किंवा भीती घालण्याचा प्रयत्न करील** | ३०८(५) | ३८६ |
| ४९ | **बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीस जो कोणी तिने/अन्य कोणत्याही व्यक्तीने मृत्यु/आजन्म कारावास/ १० वर्षापर्यंत अशा शिक्षेस पात्र अपराध केल्याचा किंवा करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्या व्यक्तीविरुध्द करण्याची भिती घालील किंवा तसा प्रयत्न करील** | ३०८(६) | ३८९ |
| ५० | **एखाद्या व्यक्तीस जो कोणी तिने/अन्य कोणत्याही व्यक्तीने मृत्यु/आजन्म कारावास/१० वर्षापर्यंत अशा शिक्षेस पात्र अपराध केल्याचा किंवा करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप कोणत्याही इसमाला प्रवृत्त केल्याचा आरोप तिच्याविरुध्द किंवा त्या अन्य व्यक्तीविरुध्द** | ३०९(७) | ३८८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | **करण्याची भिती घालुन बलादग्रहण करील** | | |
| ५१ | **जबरी चोरी** | ३०९(४) | ३९२ |
| ५२ | **जबरी चोरी करताना किंवा करण्याचा प्रयत्नात इच्छापुर्वक दुखापत करणे** | ३०९(६) | ३९४ |
| ५३ | **दरोडा** | ३१० (२) | ३९५ |
| ५४ | **खुनासह दरोडा** | ३१०(३) | ३९६ |
| ५५ | **दरोडा घालण्याची पुर्व तयारी करणे** | ३१० (४) | ३९९ |
| ५६ | **दरोड्यांचा टोळीपैकी असल्याबाबत** | ३१०(६) | ४०० |
| ५७ | **मृत्यु/जबर दुखापत घडवुन आणण्याच्या प्रयत्नासहित जबरी चोरी /दरोडा** | ३११ | ३९७ |
| ५८ | **लोकसेवकाने/बँक व्यवसायीने, व्यापारी/अभिकर्ता यांनी केलेला फौजदारी पात्र न्यासभंग** | ३१६ (५) | ४०९ |
| ५९ | **ठकवणुक (फसवणुक)** | ३१८ (४) | ४२० |
| ६० | **ठकवणुक करण्यासाठी बनावटीकरण** | ३३६ (3) | ४६८ |
| ६१ | **मुल्यवान रोखा मृत्युपत्रे इ. बनावटीकरण** | ३३८ | ४६७ |
| ६२ | **संघटीत गुन्हेगारी कृत्यामुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यु झाला असेल** | १११(२)(a) | तरतुद नाही |
| ६३ | **संघटीत गुन्हेगारी कृत्यामुळे मृत्यु सोडुन इतर कोणतेही प्रकरण** | १११(२)(b) | तरतुद नाही |
| ६४ | **संघटीत गुन्हेगारी करण्यास अपप्रेरित करील, प्रयत्न करेल, षडयंत्र रचेल/जाणीवपुर्वक मदत करेल/अन्यथा संघटित गुन्हयाची तयारी करणा-या कोणत्याही कृतीत गुंतेल** | १११(३) | तरतुद नाही |
| ६५ | **संघटीत गुन्हेगारी सदस्य असणे** | १११(४) | तरतुद नाही |
| ६६ | **संघटीत गुन्हेगारी केलेल्या व्यक्तीला आसरा देणे किंवा लपवुन ठेवणे** | १११ (५) | तरतुद नाही |
| ६७ | **संघटीत गुन्हेगारी करुन मिळविलेली/प्राप्त केलेली मालमत्ता/कमाई कब्जात ठेवणे** | १११ (६) | तरतुद नाही |
| ६८ | **संघटीत गुन्हेगारी संघाच्या सदस्याच्या वतीने जंगम/स्थावर मालमत्ता कब्जात ठेवेल ज्याचे त्याला समाधानकारक उत्तरे देता येणार नाही** | १११ (७) | तरतुद नाही |

# भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील महत्वाच्या टाईमलाईन

**B.N.S.S. कलम** ३९(३) -

नाव व राहण्याचे ठिकाण सांगण्यास नकार दिल्यावरुन अटक केलेल्या व्यक्तीला **अटकेच्या वेळेपासुन २४ तासांच्या आत** खात्री झाली नाही किंवा बंधपत्र किंवा जामीन बंधपत्र किंवा पुरेसे जामीनदार देण्यास चुकली तर अधिकारीता असलेल्या सर्वात जवळच्या दंडाधिका-याकडे तात्काळ पाठविण्यात येईल.

**B.N.S.S. कलम** ४०(१) -

कोणतीही खाजगी व्यक्ती, तिच्या समक्ष ज्याने अजामीनपात्र आणि दखलपात्र अपराध केला आहे किंवा कोणत्याही उदघोषित अपराध्यास अटक करु शकेल किंवा करवू शकेल अशा अपराध्यास **अटकेपासुन ६ तासांच्या आत** पोलीस अधिक-याच्या स्वाधीन करील किंवा करवील किंवा पोलीस अधिकारी अनुपस्थित असल्यास अशा व्यक्तीला बंदोबस्तात सर्वात जवळच्या पोलीस ठाण्यावर नेईल किंवा नेववील.

**B.N.S.S. कलम** ४८(१) -

प्रत्येक पोलीस अधिकारी किंवा इतर व्यक्ती, अटक करण्यात आलेल्या व्यक्तीच्या अटकेबाबत त्याचे नातेवाईक/मित्र किंवा अन्य इतर व्यक्ती आणि **जिल्ह्यातील पदनिर्देशित पोलीस अधिका-याला तात्काळ कळविल**.

**B.N.S.S. कलम** ५० -

कोणताही अटक करणारा पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती, **अटक केल्यानंतर लागलीच अटक झालेल्या व्यक्तिच्या अंगावर जी कोणतीही मारक हत्यारे असतील ती तिच्याकडुन अभिग्रहण करु शकेल.**

**B.N.S.S. कलम** ५१(३) -

कोणत्याही पोलीस अधिका-याच्या विनंती वरुन आरोपीची तपासणी करणारा **नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीक कोणताही विलंब न करता, तपासणी अहवाल तपास अधिका-याकडे पाठविल.**

**B.N.S.S. कलम** ८४(१) -

जर कोणत्याही न्यायालयाने फरार व्यक्तीबद्दल उद्घोषणा काढली असेल तर, असे न्यायालय एक लेखी उद्घोषणा प्रकाशित करुन, विनिर्दिष्ट स्थळी व अशी **उदघोषणा प्रकाशित केल्याच्या दिनांकापासुन कमीत कमी ३० दिवसांच्या मुदतीनंतरच्या** विनिर्दिष्ट वेळी त्या व्यक्तीला उपस्थित राहण्यास फर्मावू शकेल.

**B.N.S.S. कलम** १०५ -

कलम १८५ अंतर्गत पोलीस अधिका-याने घेतलेली झडती व जप्ती याचे चित्रण कोणत्याही ऑडिओ-व्हिडिओ वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) माध्यमाने शक्य तो मोबाईल फोनद्वारे रेकॉर्ड केले जावे आणि पोलीस अधिका-यानी असे रेकॉर्डींग **जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्याकडे विनाविलंब पाठवावे.**

**<u>B.N.S.S. कलम १०७(२) –</u>**
जर न्यायालयाला किंवा दंडाधिका-याला, पुरावा घेण्यापुर्वी किंवा पुरावा घेतल्यानंतर असे समजण्यास आधार असेल की, अशा सर्व किंवा कोणतीही मालमत्ता या गुन्ह्याच्या उत्पन्नातील आहेत तर, ते न्यायालय किंवा तो दंडाधिकारी अशा व्यक्तीला नोटीस बजावुन **१४ दिवसांच्या कालावधीत जप्तीचा आदेश** का काढण्यात येऊ नये याची कारणे दाखवा नोटीस काढू शकेल.

**<u>B.N.S.S. कलम १०७(४) –</u>**
या कलमान्वये **अशा व्यक्तीने १४ दिवसांच्या कालावधीत न्यायालयासमोर किंवा दंडाधिका-यासमोर** त्याची बाजु नाही मांडली तर न्यायालय किंवा दंडाधिकारी एकतर्फी आदेश काढण्याची कार्यवाही करु शकेल.

**<u>B.N.S.S. कलम १०७(७) –</u>**
या कलमान्वये पोटकलम (६) खाली न्यायालय किंवा दंडाधिकारी यांनी दिलेला आदेश प्राप्त झाल्यावर **जिल्हादंडाधिकारी ६० दिवसांच्या आत गुन्ह्याच्या उत्पन्नाचे एकतर स्वत: वितरण करील किंवा दुय्यम अधिका-याला असे वितरण करण्यास प्राधिकृत करेल.**

**<u>B.N.S.S. कलम १७२(२) –</u>**
पोलीसांच्या कायदेशिर निर्देशांचे पालन करण्यास विरोध, नकार, दुर्लक्ष किंवा अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीला पोलीस अधिकारी ताब्यात घेवु शकतो किंवा हलवु शकतो किंवा अशा व्यक्तीला दंडाधिका-यासमोर नेवु शकतो किंवा **२४ तासांच्या कालावधीच्या आत त्याला मुक्त करु शकतो.**

**<u>B.N.S.S. कलम १७३(१)(२) –</u>**
प्रथम खबर वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) स्वरुपात प्राप्त झाल्यास **प्रथम खबर देणा-या व्यक्तीने ३ दिवसांच्या आत स्वाक्षरी केल्यावर तीची नोंद घेण्यात येईल.**

**<u>B.N.S.S. कलम १७३(३)–</u>**
तीन वर्ष किंवा त्याहुन अधिक परंतु सात वर्षापेक्षा कमी शिक्षा होवु शकणा-या गुन्ह्यामध्ये पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी पोलीस उप-अधिक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-याच्या पुर्व परवानगीने अपराधाचे गांभीर्य व स्वरुप लक्षात घेऊन त्या प्रकरणात **१४ दिवसांच्या कालावधीत प्राथमिक चौकशीची कार्यवाही करेल.**

**<u>B.N.S.S. कलम १७४(१)(२)–</u>**
पोलीस अधिकारी/अंमलदार पोलीस ठाण्यात दाखल **अदखलपात्र प्रकरणांचे दैनिक अहवाल १५ दिवसातुन दंडाधिका-यांना पाठविल.**

**<u>B.N.S.S. कलम १७४(३)–</u>**
तीन वर्ष किंवा त्याहुन अधिक परंतु सात वर्षापेक्षा कमी शिक्षा होऊ शकणारा कोणताही दखलपात्र गुन्हा घडल्याची माहीती मिळाल्यावर गुन्ह्याचे स्वरुप आणि गांभीर्य लक्षात घेता पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस उप अधिक्षक दर्जाच्या खाली नसलेल्या अधिका-याची पुर्व परवानगी घेऊन. **१४ दिवसांच्या आत या प्रकरणाची कार्यवाही करण्यासाठी प्रथमदर्शनी प्रकरण अस्तित्वात आहे की नाही हे तपासण्यासाठी प्राथमिक चौकशी करु शकतात.**

**B.N.S.S. कलम १८४—**

बलात्कारास बळी पडलेल्या स्त्रीचा वैद्यकीय तपासणी अहवाल **नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी ७ दिवसांच्या** कालावधीच्या आत अहवाल विनाविलंब तपास अधिका-याकडे पाठविल व तपास अधिकारी तो कलम १९३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दंडाधिका-याकडे पाठविल.

**B.N.S.S.- १८७ –**

या कलमांतर्गत आरोपी व्यक्ती ज्या दंडाधिकाऱ्याकडे पाठविली जाते, त्याला खटला चालविण्याचा अधिकार आहे किंवा नाही याची पर्वा न करता, अशी व्यक्ती जामीनावर बंधमुक्त झाली आहे काय किंवा त्याचा जामीन रद्द झाला आहे काय हे विचारात घेवुन वेळोवेळी, अशा दंडाधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा कोठडीत आरोपीला, **एकुण १५ दिवसांपेक्षा जास्त नसेल** एवढ्या कालावधीसाठी, किंवा काही भांगामध्ये, **६० दिवस किंवा ९० दिवसांच्या** अटकेच्या कालावधीपैकी सुरवातीचे **४० दिवस किंवा ६० दिवस** कोणत्याही वेळी कोठडीत ठेवण्याची परवानगी दिली जाते.

**B.N.S.S.- १९३(२) –**

महिला व बालकांसंदर्भातील गुन्ह्याचे दोषारोपपत्र गुन्हा दाखल झाल्यापासुन **२ महिन्याचे आत** दाखल करण्यात यावेत. (**B.N.S.**कलम **६४/ ६५/ ६६/ ६७/ ६८/ ७०/ ७१** तसेच पोक्सोमधील कलम **४/ ६/ ८/ १०)**

**B.N.S.S.- १९३(३) –**

तपास अधिकारी यांनी **९० दिवसांच्या आत** फिर्यादी/ पिडीत यांना केलेल्या तपासाचा प्रगती अहवाल सादर करावा (सदर अहवाल इलेक्ट्रॉनिक स्वरुपात देखील देवु शकतो)

**B.N.S.S.- १९३(९) –**

गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केल्यानंतर खटला चालविणा-या न्यायालयाच्या परवानगीने खटल्या दरम्यान पुढील तपास केला जाऊ शकतो व तो **९० दिवसांच्या कालावधीत,** जो न्यायालयाच्या परवानगीने वाढविला जाऊ शकतो एवढ्या कालावधीत, पुर्ण केला जाईल.

**B.N.S.S.- १९४(२) –**

आत्महत्या, इत्यादीबाबत पोलीसांनी केलेल्या मृत्युच्या दर्शनी कारणांचा अहवाल (इन्क्वेस्ट पंचनामा) **२४ तासांच्या आत** जिल्हा दंडाधिका-यांकडे किंवा उप-विभागीय अधिका-यांकडे पाठविला जाईल.

**B.N.S.S.- २१८ –**

न्यायाधिश किंवा लोकसेवक यांच्याविरुध्द खटला चालविण्याकरीता राज्य शासनाच्या पुर्व परवानगी खेरीज कोणतेही न्यायालय अशा अपराधाची दखल घेणार नाही, परंतु **सरकार मंजुरीसाठी विनंती प्राप्त झाल्यापासुन १२० दिवसांच्या कालावधीत निर्णय घेईल** आणि तसे करण्यात ते अयशस्वी झाल्यास अशा सरकारने मंजुरी दिली आहे असे मानले जाईल.

**B.N.S.S.- २३०—**

पोलीस अहवालावरुन कार्यवाही सुरु करण्यात आली असेल अशा कोणत्याही प्रकरणी दंडाधिकारी आरोपीला **विनाविलंब आणि कोणत्याही परिस्थितीत आरोपीला सादर किंवा हजर केल्याच्या तारखेपासुन १४ दिवसांपेक्षा जास्त नसेल** अशी आरोपीला आणि पिडीतेला अहवालाची प्रत विनामुल्य देईल.

**B.N.S.S.- २५०** –
कलम २३२ अन्वये आरोपी दोषारोप दाखल केलेल्या तारखेपासुन **६० दिवसांच्या कालावधीत दोष मुक्तीसाठी अर्ज करु शकतो.**

**B.N.S.S.- २५१**–
या कलमान्वये आरोपीने केलेला अपराध **केवळ सत्र न्यायालयाने** संपरीक्षा करण्याजोगा आहे असे गृहीत धरण्यास आधार आहे, असे न्यायाधिशाचे मत झाले तर, तो **पहिल्या सुनावणीच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या कालावधीत आरोपी विरुध्द दोषारोपाची लेखी मांडणी करेल.**

**B.N.S.S.- २५८**–
या कलमान्वये युक्तीवाद आणि कायद्याचे मुद्दे ऐकल्यानंतर न्यायाधीश शक्य तितक्या लवकर **युक्तीवाद पुर्ण झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत किंवा लेखी कारणे नोंदवित ४५ दिवसांच्या कालावधी पर्यंत** वाढवता येवु शकेल या खटल्यातील निकाल देईल.

**B.N.S.S.- २६३(१)** –
न्यायालयीन चौकशी (संपरीक्षा) करण्याजोगा अपराध आरोपीने केला आहे हे गृहीत धरण्यास आधार आहे असे दंडाधिका-याचे मत झाले तो आरोपीवरील **पहील्या सुनावणीच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या कालावधीत आरोपीविरुध्द दोषारोपांची लेखी मांडणी करील.**

**B.N.S.S.- २७२** –
फिर्यादीवरुन दाखल खटल्याच्या सुनावणीसाठी फिर्यादिदार अनुपस्थितीत असेल आणि अपराध कायद्याने आपसात मिटवता येत असेल, अपराध दखलपात्र नसेल तेव्हा दोषारोपपत्राची मांडणी केली जाण्यापुर्वी कोणत्याही वेळी दंडाधिकारी तक्रारकर्त्याला हजर राहण्यासाठी **३० दिवसांचा कालावधी देवुन स्वविवेकानुसार आरोपीस विनादोषारोप सोडु शकेल.**

**B.N.S.S.- २९०**–
या कलमान्वये एखाद्या अपराधाचा आरोप असलेली व्यक्ती तडजोड करण्यासाठीच्या विनंतीसाठी, असा अपराध ज्या न्यायालयात न्याय चौकशीसाठी प्रलंबित आहे **त्या न्यायालयाकडे तडजोड करण्यासाठी ३० दिवसांच्या आत** अर्ज करु शकेल.

**B.N.S.S.- ३१६(४)**–
आरोपी जेथे कोठडीत असेल आणि विजकीय (इलेक्ट्रॉनिक) संप्रेषणाद्वारे त्यांची तपासणी केली जाईल, अशा **तपासणीच्या अहवालावर ७२ तासाच्या आत त्याची स्वाक्षरी घेतली जाईल.**

**B.N.S.S.- ३३०(१)**–
मा. न्यायालयापुढे फिर्यादी पक्षाने किंवा आरोपीने कोणताही दावा दाखल केला असेल तेव्हा प्रत्येक दस्तऐवजाचा तपशील सुचित समाविष्ट केला जाईल, दस्तऐवज दाखल झाल्यानंतर लगेचच किंवा कोणत्याही परिस्थितीत दाखल झाल्यानंतर **फिर्यादीला किंवा आरोपीला ३० दिवसांच्या आत खरेपणा कबुल किंवा ना कबुल करण्यास सांगितले जाईल.**

**B.N.S.S.- ३५६(१)**–
न्यायालय, जेव्हा एखादी व्यक्ती घोषित अपराधी म्हणुन घोषित केली जाते अशा व्यक्तीच्या अनुपस्थितीत तो उपस्थित होता असे समजुन न्याय चौकशी व न्यायनिर्णय अभिघोषित करील, परंतु **आरोप निश्चित केल्याच्या तारखेपासुन ९० दिवसांचा कालावधी संपल्याशिवाय न्यायालय खटला सुरु करणार नाही.**

**B.N.S.S.- ३५६(२)(१)**–
घोषित अपराधी न्यायचौकशी करीता अनुपस्थितीत न्यायालय **किमान ३० दिवसांच्या अंतराने सलग दोन अटक वॉरंट जारी करेल.**

**B.N.S.S.- ३५६(२)(२)**–
न्यायचौकशीसाठी घोषित आरोपी न्यायालयासमोर हजर राहणे आवश्यक आहे आणि अशा **प्रकाशनाच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या आत** जर तो हजर राहण्यास अपयशी झाला तर न्यायचौकशी त्याच्या अनुपस्थितीत सुरु होईल हे त्याला कळवण्यासाठी, त्याच्या शेवटच्या ज्ञात रहीवासाच्या पत्त्याच्या ठिकाणी प्रसारीत होणा-या राष्ट्रीय किंवा स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात प्रकाशित करणे.

**B.N.S.S.- ३९२(१)**–
मुळ अधिकारीतेच्या कोणत्याही फौजदारी न्यायालयामध्ये प्रत्येक संपरीक्षेतील न्यायनिर्णय न्यायालयीन चौकशी (संपरीक्षा) संपल्यानंतर ताबडतोब किंवा **त्यानंतरच्या ४५ दिवसानंतर नसेल अशा एखाद्या वेळी पक्षकारांना किंवा त्याच्या वकीलांना त्याबाबत नोटीस देईल.**

**B.N.S.S.- ३९२(४)**–
न्यायालयाने, यथावकाश, निकालाच्या तारखेपासुन **७ दिवसांच्या आत निकालीची प्रत संकेतस्थळावर (पोर्टलवर) अपलोड करावी.**

**B.N.S.S.- ४०४**–
आरोपीला कारावासाचा शिक्षादेश देण्यात येईल तेव्हा, **न्यायनिर्णय घोषित झाल्यानंतर ताबडतोब त्या न्यायनिर्णयाची एक प्रत त्याला विनामुल्य देण्यात येईल.**

**B.N.S.S.- ४७२(१)**–
मृत्युदंडाची शिक्षेखालील दोषी किंवा त्याचा कायदेशीर वारस किंवा अन्य कोणी नातेवाईक यांना, तुरुंगाच्या अधिक्षकाने त्याला माहीत करुन दिल्यानंतर **३० दिवसांच्या कालावधीत राज्याच्या राज्यपालांसमोर दयेचा अर्ज दाखल करु शकतो.**

**B.N.S.S.- ४७२(२)**–
पोटकलम (१) अंतर्गत राज्यपालांनी याचिका, नाकारली किंवा निकाली काढल्यावर, **याचिका फेटाळल्याच्या किंवा निकालाच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत राष्ट्रपतींकडे केली जाईल.**
पोटकलम (६) दयेच्या विनंती अर्जावर राष्ट्रपतींचा आदेश प्राप्त झाल्यानंतर केंद्र सरकार अठ्ठेचाळीस तासांच्या आत तो राज्य शासनाच्या गृह विभागाला व तुरुंगाच्या अधिक्षकाला किंवा तुरुंगाच्या प्रभारी अधिका-यांना कळविल.

**B.N.S.S.- ४९७(२)**–
न्यायालय किंवा न्यायदंडाधिकारी पोटकलम (१) मधील नमुद केलेल्या मालमत्तेची निर्मिती **केल्यापासुन १४ दिवसांच्या आत अशा मालमत्तेचे विवरण** असलेले विवरणपत्र राज्य सरकार नियमांद्वारे प्रदान करेल अशा स्वरुपात आणि रितीने तयार करतील.